रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ७६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

**पाहिजेत**
१. अकाऊंटंड क्लार्क
२. गार्डनसाठी महिला
३. किचन हेल्पर
४. रिसेप्शनसाठी व्यक्ती
अर्जासह समक्ष भेट
हॉटेल साईइन, चोंढी, अलिबाग-रेवस रोड, अलिबाग

रायगड, गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## वेधक

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

। पनवेल । वार्ताहर ।

अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी एकावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल थडराई हे बारापाडा, पनवेल येथे राहत असून, त्यांची १४ वर्षीय बहीण शाळेत जाते, असे सांगून घरातून निघून गेली आणि परतलीच नाही. तिचा वर्ण सावळा, बांधा मध्यम, उंची पाच फूट आहे. मुलीबाबत अधिक माहिती असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक सुभाष डिगे यांनी केले आहे.

### साडेसहा लाखांचा गंडा

**पनवेल :** एका व्यावसायिकाला तब्बल ६ लाख ५० हजार रुपयांना गंडा घालण्यात आल्याची घटना घडली आहे. अमित वर्मा हे लॉजिस्टिक्स व्यवसायाशी संबंधित असून ते कामोठे येथे वास्तव्यास आहेत. वर्मा यांना अनोळखी व्यक्तीकडून ग्राहक केअर प्रतिनिधी असल्याचे भासवून संपर्क साधला गेला. फसवणूक करणाऱ्यांनी एक एपीके फाइल पाठवली. ती मोबाइलमध्ये इन्स्टॉल केल्यावर फसवणूक करणाऱ्यांना त्यांच्या मोबाइल व बँक खात्याची माहिती मिळाली. त्यानंतर तत्काळ ६.५ लाख रुपये ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या बँक खात्यातून वळते झाले. ही फसवणूक लक्षात येताच वर्मा यांनी तातडीने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

# शिंदे गटाच्या गुंडगिरीचा निषेध

। अलिबाग । प्रतिनिधी ।

केवळमतासाठीआश्वासनांचा पाऊस पाडणाऱ्या आमदारांनी मतदारांच्या तोंडाला पानेच पुसली आहे. रस्त्यांची अवस्था बिकट आहे. पाणी प्रश्न, वीज बिल, आरोग्य आदी अनेक विषयांकडे दुर्लक्ष केले जात आहे. केवळ सत्तेच्या जोरावर सर्वसामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी त्यांच्या पोकळ धमक्यांना भीक न घालता सर्वसामान्यांच्या हक्कासाठी आवाज उठविला. मात्र आमदारांच्या पत्नीला पन्नास खोके चांगलेच झोंबले आणि त्यांनी पाठीमागून भ्याड हल्ला केला.

नागरिकांच्या मुलभूत हक्कांकडे दुर्लक्ष करुन न्यायासाठी लढणाऱ्यांचा आवाज दाबण्यासाठी शिंदे गटाची गुंडगिरी दिवसेंदिवस वाढत आहे. अखेर सत्तेचा माज पान २ वर

## शेकापचा आक्रमक पवित्रा




### शेतकरीभवनसमोर निषेध मोर्चा

शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यावर मागून मंगळवारी भ्याड हल्ला करण्यात आला. या भ्याड हल्ल्याबाबत कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. सर्वत्र जाहीर निषेध व्यक्त केला जात आहे. चित्रलेखा पाटील यांच्यावर मागून झालेल्या हल्ल्याच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निषेध सभा अलिबागमध्ये घेण्यात आली. यावेळी महिलांसह अनेकांनी हल्ल्याचा निषेध आपल्या शैलीत व्यक्त केला. त्यानंतर शेतकरी भवन समोर सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन मानसी दळवीसह अन्य जणांविरोधात घोषणा देण्यात आल्या. या निषेध मोर्चात शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण, तरुणी व ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान हातात काळे झेंडे दाखवून अनेकांनी व्यक्त केला.

### दंडेलशाही विरोधात लढण्यासाठी सज्ज व्हा : ॲड. मानसी म्हात्रे

सध्या अलिबाग, मुरूड रोहा मतदार संघाची काय परिस्थिती आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पुलांची अवस्था बिकट झाली आहे. विद्यार्थी, महिला, कामगारांना चिखल, खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे एसटी फेऱ्या बंद आहेत. प्रवासी त्रस्त झाले आहेत. स्मार्ट मीटरच्या नावाखाली तिप्पट वीज बिलामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या मतदार संघात अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांकडे पान २ वर

# शिंदे गटातील सुधीर चेरकरची गुंडगिरी

## एसटी चालकाला केली मारहाण

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागहून सुडकोलीकडे जाणाऱ्या एसटीचा मार्ग अडवून शिंदे गटातील सुधीर चेरकर याने भर रस्त्यात चालकाला मारहाण केली. ही घटना मंगळवारी सकाळी वावे नाका येथे घडली. एसटीतील चालकाच्या केबीनमध्ये घुसून हा प्रकार त्याने केला. गुंडगिरी करणाऱ्या सुधीर चेरकर विरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यापूर्वीदेखील त्याने एकाला मारहाण केल्याप्रकरणी त्याच्याविरोधात कारवाई करण्यात आली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, नागनाथ भुरे असे या अन्यायग्रस्ताचे नाव आहे. हा इसम अलिबाग एसटी बस आगारात चालक म्हणून गेल्या अनेक महिन्यांपासून काम करीत आहे. मंगळवारी (दि.१९) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास एम.एच.२० बी.एल.३८७६ या क्रमांकाची एसटी बसमधून प्रवाशांना घेऊन सुडकोलीकडे सकाळी नऊ वाजता बस निघाली. सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास वावे नाका येथे आल्यावर एम.एच. ०६ सी. एल.०३०० या सफेद रंगाच्या कारमुळे एसटी पुढे नेण्यास अडथळा निर्माण झाला.



कारमधील चालक सुधीर चेरकर यांना गाडी बाजूला नेण्यास सांगितले. मात्र त्याने गाडी बाजूला न घेता एसटीच्या समोर कार आडवी घालून एसटीला पुढे जाण्याचा मार्ग अडविला.

त्यानंतर कारमधून बाहेर येऊन त्याने एसटी चालकाच्या केबिनमध्ये घूसून चालकाला मारहाण केली. त्यामध्ये एसटी चालक जखमी झाला असून त्याला किरकोळ दुखापतही झाली आहे. रस्त्यात कार आडवी घालून एसटीचा जाण्याचा मार्ग अडवून चालकाला मारहाण केल्याप्रकरणी सुधीर चेरकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रतिबंधात्मक कारवाईदेखील पोलिसांकडून करण्यात आली आहे.

# नागरिकांचे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतर

। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन दिवसापासून अतिवृष्टी होत आहे. बुधवारीदेखील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट असून मुसळधार पावसाचा इशारा आहे. अतिवृष्टीच्या काळात पनवेल महानगरपालिका हद्दीतील सुमारे ४०० बाधितांना चार तात्पुरत्या निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले आहे. त्यांना चांगल्या सोयी सुविधा पुरवाव्यात असे स्पष्ट आदेश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. याबरोबरच आयुक्त पान २ वर

### आयुक्तांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**बुधवारी सकाळी १०.३० वाजता आयुक्त तसेच अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी कळंबोली होल्डिंग पाँड येथील महानगरपालिकेतर्फे लावण्यात आलेल्या पाणी उपसा पंपांची पाहणी केली. पाणी निचरा यंत्रणा सुरळीतपणे कार्यरत असल्याची खात्री त्यांनी करून घेतली. कळंबोलीमध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोली मधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरु ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच पनवेलमध्ये गाढी नदीच्या पाणीपातळीवर देखील लक्ष ठेऊन याबाबतची माहिती देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.**

# श्रीमंतांसाठी भिंत, सामान्यांसाठी मृत्यू

- **दरडप्रणव क्षेत्रात समावेश नसताना भोईघर येथे ५ कोटीची संरक्षक भिंत**
- **मिठेखारच्या येथे संरक्षक भिंत बांधण्याच्या दुर्लक्षामुळे गरिब महिलेचा बळी**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दरडप्रवण क्षेत्रात नसतानाही मुरूड तालुक्यातील भोईघर येथे पाच कोटी रुपयांची संरक्षक भिंत बांधण्यात आली. धनदांडग्यांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंत तातडीने बांधण्यात आली. मात्र दरडप्रवण क्षेत्र असलेल्या मिठेखारची संरक्षण भिंत बांधण्याची मागणी करूनही ही भिंत बांधण्यास प्रशासन उदासीन ठरले आहे. प्रशासन व आमदाराच्या दुर्लक्षामुळे अखेर दरड कोसळून वयोवृध्द महिलेचा नाहक बळी गेला. त्यामुळे आमदार दळवी यांच्या भूमिकेबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

भोईघर येथील विलोभनीय समुद्र किनाऱ्याच्या पार्श्वभूमीवर धनदांडग्यांनी त्यांच्या मालमत्ता खरेदी केल्या आहेत. यामध्ये काही लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांचाही समावेश आहे. दरडीसारख्या नैसर्गिक आपत्तींपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासनाकडून संरक्षक भिंतींची कामे केली जातात. मात्र दरडप्रणव क्षेत्रात भोईघरचा समावेश नाही. तरीदेखील प्रशासनाने तत्परतेने ५ कोटीची संरक्षक भिंत का बांधली? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी उपस्थित केला आहे. मुरूड तालुक्यातील भोईघर किनारपट्टीवर संरक्षक भिंतींचे तब्बल ५ कोटी रुपयांचे काम झाले. मात्र हे काम स्थानिक धनदांडग्यांच्या मालमत्तांच्या रक्षणासाठी केल्याच्या आरोपांनी ग्रामस्थांमध्ये संताप उसळला आहे. दुसरीकडे, तालुक्यातील दरडप्रवण पान २ वर

### आमदारांच्या पत्नीची कबुली

**दोन वर्षांपूर्वीदेखील या ठिकाणी दरड कोसळण्याची घटना घडली होती. त्यावेळी देखील आमदारांच्या पत्नीने गावाची पाहणी केली असल्याचे त्यांनी कबुल केले आहे. असे असताना आमदारांनी तात्काळ यावर का उपाययोजना केली नाही? असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला असून प्रशासनासह आमदारांनीही नागरिकांच्या जीवाशी खेळ केला असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच हा प्रश्न दोन वर्षे सोडविण्यास आमदार निष्क्रिय ठरल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे.**



# रस्त्यावरील खड्ड्यात कागदी होड्या सोडत आंदोलन

## कामोठे कॉलनी फोरमचा आक्रमक पवित्रा

। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।

रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यातील पाण्यात कागदी होड्या सोडत कामोठे कॉलनी फोरमच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी निष्कृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाबाबत पालिका प्रशासनाला धारेवर धरत जाब विचारण्यात आला. तसेच गणेशोत्सवापूर्वी पालिकेच्या वतीने जर रस्त्याची डागडूजी करण्यात आली नाही तर कामोठे कॉलनी फोरमतर्फे भव्य आंदोलन उभारण्याचा इशारादेखील यावेळी देण्यात आला.



पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेली नालेसफाईची कामे अपयशी ठरलेली असून कामोठे शहरातील बहुतांश भागात पावसाचे पाणी साचले आहे. यासाठी पालिका प्रशासनाचा बेजबाबदारपणा कारणीभूत असून पालिका प्रशासनाने लवकरात लवकर ज्या भागांमध्ये पावसाचे पाणी साचलेले आहे, अशा सर्व भागांची तातडीने पान २ वर

### बोरघाट अवजड वाहतुकीसाठी बंद

। रायगड । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे महामार्ग बोरघाट या महामार्गावर जड-अवजड वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून पुढील आदेश होईपर्यंत बोरघाटात सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी पूर्णत: बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे. सदर कालावधीकरीता रायगड हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीकरीता बंद करण्याबाबत पोलीस अधीक्षक रायगड यांच्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई-पुणे महामार्ग बोरघाट हा तीव्र चढउताराचा वळणाचा रस्ता असल्याने घडलेल्या अपघातांच्या घटनांमुळे तसेच सद्यस्थितीत वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून उपाययोजना व जनतेच्या सुरक्षिततेसाठी या महामार्गावरुन जड-अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची खात्री झाली आहे.






# महाविकास आघाडी धडकली सिडकोवर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महायुती सरकारच्या काळात सिडको महामंडळाचे अध्यक्षपद २५ दिवसांसाठी विद्यमान मंत्री संजय शिरसाट यांना देऊन त्यांच्या अध्यक्षतेखालच्या पहिल्याच बैठकीत पाच हजार कोटी रुपयांचे सरकारचे नुकसान करून बिवलकर कुटूंबियांना सिडकोने भूखंड वाटप केल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) आ. रोहित पवार यांनी संबंधित प्रकरणातील लाभार्थी बिवलकर कुटूंबियांना भूखंड देण्याची प्रक्रिया थांबवून संबंधित प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे बुधवारी केली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासह नवी मुंबई आणि पनवेल व उरणचे महाविकास आघाडीतील पदाधिकारी सुद्धा उपस्थित होते.

तीन दिवसांपूर्वी प्रसारमाध्यमांसमोर आ. रोहित पवार यांनी सिडकोमध्ये झालेल्या भूखंड घोटाळ्याविषयी आरोप केल्यानंतर नवी मुंबईतील बेलापूर येथील सिडको भवनावर बुधवारी मोर्चा काढणार अशी घोषणा आ. पवार यांनी केली होती. मात्र अतिवृष्टीमुळे मोर्चा महाविकास आघाडीने टाळला. त्याऐवजी नवी मुंबईतील महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील मुख्य कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले.

यावेळी शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (ठाकरे गट) चे बबन पाटील, शिरीष घरत, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी भावना घाणेकर, सतिष पाटील तसेच महाविकास आघाडीतील इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सिडकोला दिलेल्या लेखी निवेदनात, तब्बल ५३ हजार चौरस मीटर इतक्या प्रचंड भूखंडाचे बिवलकर कुटुंबाला झालेले वाटप गंभीर शंका निर्माण करणारे असल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणाची पारदर्शक चौकशी होऊन सर्व बाबी जनतेसमोर याव्यात, अशी मागणी करण्यात आली. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत हे वाटप तातडीने थांबविण्याची सूचना विजय सिंघल यांना देण्यात आली.या भूखंड वाटपामुळे सिडको प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित निर्णय प्रक्रियेवर राजकीय व सामाजिक स्तरावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. स्थानिकांमध्येही या प्रकरणाविषयी संभ्रमाचे वातावरण असून, महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे यापूढे सिडकोला भूखंड वाटपावेळी अधिक पारदर्शकपणे काम करावे ला-गणार आहे.या मोर्चामध्ये शशिकांत शिंदे प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) बबन पाटील, भावना घाणेकर, शिवसेना शिरीष घरत, काँग्रेस सुदाम पाटील अन्य बडे नेते उपस्थित होते.

## पोलिसांकडून मंडळांना मार्गदर्शन




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका पोलीस ठाणे तर्फे येथे आगामी दहीहंडी व गणेश उत्सव निमीत्ताने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी यांची बैठक सहा. पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली, यावेळी विविध सूचना देण्यात आल्या.

या बैठकीमध्ये पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी विविध सूचना केल्या. त्यामध्ये कार्यक्रम ठिकाणी सीसीटीव्ही लावणे व स्वयंसेवक यांची नेमणूक करावी. संबंधीत सर्व आस्थापनाची परवानगी विहीत वेळेत प्राप्त करणे, उत्सवा दरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, तसेच इतर नागरीकांना त्रास होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेणे, सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना प्रथमोपचार पेटी, डॉक्टरांची टीम, ॲम्बुलन्स इत्यादी सोय करणे, कार्यक्रमावेळी कोणत्याही जाती-धर्माच्या धार्मीक भावना दुखावल्या जातील असे बॅनर, पोस्टर, आक्षेपार्ह गाणे, पोवडा, वाद्य, संगीत लावू नये, तसेच आक्षेपार्ह भाष्य करू नये, आदींबाबत मार्गदर्शन केले.

पान १ वरुन

## शिंदे गटाच्या गुंडगिरीचा निषेध

असल्यामुळे कायद्याची तमा न बाळगता, नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या शिंदे गटाच्या गुंडगिरीविरोधात आक्रमक पवित्रा घेत शेतकरी कामगार पक्षाने बुधवारी (दि.२०) निषेध व्यक्त केला.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी, अलिबाग तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, शेकाप शहर महिला आघाडी प्रमुख ॲड. निलम हजारे, सोनाली कासार, सतिश प्रधान, अशोक प्रधान, अनिल चोपडा, संजना किर, अनिल गोमा पाटील, विक्रांत वार्डे, आदींसह वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना शेकापच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या कि, हा हल्ला शेतकरी कामगार पक्षाच्या स्वाभीमानावर झालेला हल्ला आहे. समोरून हल्ला करण्याची त्यांची हिम्मत नाही, म्हणून मागून हल्ला करण्याचा डाव केला आहे. संपूर्ण राज्यात शेतकरी कामगार पक्षाची महिला आघाडी आक्रमक म्हणून ओळखली जाते, त्या पद्धतीने निषेध व्यक्त केला पाहिजे. चवळ्या पावळ्यांना महत्व न देता सुरु असलेल्या दंडेलशाही विरोधात लढण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन करीत शेकापच्या नेत्या, प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध मानसी म्हात्रे यांनी व्यक्त केला.

**षडयंत्र करणाऱ्यांना रोखण्याची गरज – सुरेश घरत**

साम, दाम, दंड, भेदचा वापर करून दाबण्याचा प्रयत्न विरोधक करीत आहेत. आपल्यावर हात उगारणाऱ्यांचे हात मोडण्याची ताकद आपल्यामध्ये आहे. दहशत करून आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. करोडो रुपयांचा निधी आणल्याच्या जाहीरातबाजी मोठ्या प्रमाणात केल्या. परंतु तो पैसा गेला कुठे असा सवाल दळवी यांना विचारला जात आहे. ठेकेदारांकडून टक्केवारी घेऊन त्यांना कामे मिळत नाही, त्यामुळे ठेकेदार शिवी देत आहेत. समाजकार्य फक्त शेकापचे आहे. या तालुक्यात अनेक विकास कामे ही शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून झाली आहेत. शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांचे कार्य समाज कार्य मोठे आहे. त्यांना रोखण्यासाठी विरोधकांचे षडयंत्र चालू आहे. वेगळ्या पध्दतीचे आंदोलन करण्याची गरज आहे. या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

**दंडेलशाही विरोधात लढण्यासाठी सज्ज व्हा : ॲड. मानसी म्हात्रे**

दुर्लक्ष करायचे आणि दादागिरी रेटून करायची ही विरोधकांची भुमिका आहे. आता हे खपवून घेणार नाही. सोशल मिडीयाचा आधार घेत वेगवेगळे व्हिडीओ टाकले जात आहेत. हे चाळे बंद झाले पाहिजे, त्या पध्दतीने आपण सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. गल्लीसह वाड्या वस्त्यांसह शहरी भागात दंडेलशाही विरोधात तुकडी तयार केली पाहिजे. विरोधक काही चुकीचे करीत असेल तर रोखणे आवश्यक आहे. शेतकरी कामगार पक्षाची ७८ वर्षाची परंपरा आहे. तीन पिढीचा वारसा आहे. संघर्षातून पक्ष निर्माण झालेला आहे. त्यामुळे चवळ्या पवळ्यांना महत्व न देता आपल्या पक्षाची ताकद त्यांना दाखविण्याची गरज निर्माण झाली आहे. चित्रलेखा पाटील यांनी हजारो मुलींना सायकली वाटप केल्या आहेत. कोरोना काळात रुग्णांबरोबरच गरीब गरजूंना मदतीचा हात दिला आहे. त्यांचे कार्य समाजाच्या हितासाठी आहे. मिठेखार येथील दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेची माहिती घेऊन प्रशासनाला जागे करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचे कार्य मोलाचे आहे, असे मानसी म्हात्रे यांनी सांगितले.

## नागरिकांचे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतर

मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत पालिकेच्या कोळीवाडा शाळेमध्ये १८७, उर्दू शाळेमध्ये १३५, क्रीडा संकुल येथे ६० नागरिकांना व बुध्दविहार नवीन पनवेल येथे ६० नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले आहे. या नागरिकांना वेळोवेळी चहापाणी, जेवण व चादर देण्याची सोय पालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त तसेच सर्व संबंधित उपायुक्त, कामोठे प्रभाग अधिक्षक, दशरथ भंडारी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य निरीक्षक अरुण कांबळे हे स्थलांतरित ठिकाणी सातत्याने भेट देत असून, नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेत आहेत.

## श्रीमंतांसाठी भिंत, सामान्यांसाठी मृत्यू

क्षेत्रात असलेल्या मिठेखार गावामध्ये दरड कोसळून दुर्दैवाने एका महिलेला जीव गमवावा लागला आहे. संरक्षक भिंत बांधण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रशासनाकडे करण्यात आली. ग्रामस्थांच्या वारंवार मागणीनंतरही येथे संरक्षक भिंत उभारली गेली नाही, याकडे गंभीर दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट झाले.

भोईघर भागातील किनारी संरक्षणासाठी शासनाने कोट्यावधी रुपये मंजूर केले. मात्र खरोखरच लोकांचे प्राण आणि उपजीविका धोक्यात असलेल्या भागांकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने दुर्लक्ष केले. परिणामी, मिठेखार येथे निसर्गकोपाचा बळी एका गरीब कुटूंबाला दयावा लागला आहे. या घटनेमुळे मृत महिलेच्या कुटुंबावर शोककळा पसरली असून गावकरी आक्रोश व्यक्त करत आहेत.

या घटनेमुळे लोकप्रतिनिधी आणि शासन यांच्यावर तीव्र टीका होत आहे. सामान्यांसाठी न्याय्य धोरण राबवून धोरणात्मक कामे केली पाहिजेत, अन्यथा ग्रामस्थांच्या तीव्र रोषाला सामोर जावे लागेल असा देत मिठेखार परिसरात संरक्षक भिंतीचे काम तातडीने हाती घेण्याची मागणी केली करण्यात आली आहे.

## रस्त्यावरील खड्ड्यात कागदी होड्या सोडत आंदोलन

नालेसफाई करून घ्यावी. तसेच शहरातील काही भागात फुटपाथवरती अतिक्रमण झाले असून नागरिकांना चालायलासुद्धा जागा शिल्लक राहिलेली नाही, असे अतिक्रमित फूटपाथ पालिकेने कारवाई करत नागरिकांसाठी त्वरित मोकळे करून देण्यात यावे, अशी मागणी केली. याशिवाय ठेकेदाराकडून निष्कृष्ट काम केले जात असूनही पालिकेकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. केवळ जनतेच्या पैशांची उधळपट्टी केली जात आहे. एकीकडे पालिका मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांवर दबाव टाकत असून नागरिकांकडून कररुपी जमा झालेला पैसा पालिका प्रशासन कशाप्रकारे उधळत आहे, असा आरोप कामोठे कॉलनी फोरमच्या वतीने करण्यात आला. यावेळी कामोठे कॉलनी फोरम अध्यक्ष मंगेश अढाव, महिला अध्यक्ष जयश्री झा, सचिव बापू साळुंखे, युवा अध्यक्ष राघव गट्टेवार अणि वैद्यकीय सेल उप प्रमुख पंकज पोडूतवार उपस्थित होते.

**पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रयत्न**

जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना २४ तास सतर्कता बाळगण्याच्या व परिस्थितीची पाहणी करण्यासाठीच्या सूचना दिल्या आहेत. तसेच सखल भागातील पाणी काढण्याच्या दृष्टीने जागोजागी जेटिंग गाडी मार्फत व जेसीबी मार्फत गटारीतील अडकलेला कचरा साफ करून चोकअप काढून घेण्यात येत असून व पाण्याचा निचरा करण्यासाठी कर्मचारी उपाय योजना करीत आहे. कळंबोली सर्कल, खारघर गावठाण तसेच पनवेल शहरातील, कामोठे, कळंबोली परिसरातील पाण्याचा निचरा करण्यासाठी पालिका यंत्रणा सज्ज आहे.

कामोठे जुईनगर येथे उपायुक्त रविकिरण घोडके यांनी भेट दिली असून सदर ठिकाणची पाहाणी केली. तसेच त्यांनी एचओसी कॉलनी, आदिवासी वाडी येथे भेट देऊन येथे धूर फवारणीबाबत सूचना दिल्या. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

दिनांक : २१/०८/२०२५

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संदीप श्रीवास्तव यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स.नं. २६५/१९, हि.नं. २, क्षेत्र ०-४९-८ हे. आर., आकार रु. ११.६२ पै. व स.नं. २६५/१९, क्षेत्र ०-४०-५ हे. आर., आकार रु. ८.०० पै. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या बे व्हिस्टा शेल या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०८ चे क्षेत्र ९५६ चौ. फुट बिल्टअप ही मिळकत.

दिनांक : २१/०८/२०२५ — **ॲड. समीर सुरेश नाईक**
अशिलांची सही — जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे. एस. एम कॉलेज जवळ
अलिबाग - रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

दिनांक : २१/०८/२०२५

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुदीप श्रीवास्तव यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स.नं. २६५/१९, हि.नं. २, क्षेत्र ०-४९-८ हे. आर., आकार रु. ११.६२ पै. व स.नं. २६५/१९, क्षेत्र ०-४०-५ हे. आर., आकार रु. ८.०० पै. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या बे व्हिस्टा शेल या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०९ चे क्षेत्र ९५६ चौ. फुट बिल्टअप ही मिळकत.

दिनांक : २१/०८/२०२५ — **ॲड. समीर सुरेश नाईक**
अशिलांची सही — जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे. एस. एम कॉलेज जवळ
अलिबाग - रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

## सुभाष महाडिक यांना मुरूडकरांनी वाहिली श्रद्धांजली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुका काँग्रेस आयचे अध्यक्ष व रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुभाष म हाडिक यांचा श्रद्धांजली कार्यक्रम वसंतराव नाईक महाविद्यालयात संपन्न झाला.काही दिवसापूर्वी त्यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले होते.त्यांच्या या श्रद्धांजली कार्यक्रमासाठी ॲड इस्माईल घोले, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, व्यापारी बँकेचे चेअरमन संदीप पाटील, प्रमोद भायदे, जिल्हा सरचिटणीस सुदेश वाणी, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, महात्मा फुले पतसंस्थेचे अध्यक्ष अजित गुरव, अस्लम हलडे, वासंती उमरोटकर, सुमित महाडिक, नितीन आंबुर्ले, कृष्णा अंबाजी, संतोष बुल्लू. नरेश बुल्लू, नितीन आंबुर्ले, सज्जाद हासवारे, सागर राऊत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.इस्माईल घोले यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, सुभाष महाडिक हे काँग्रेस विचाराचे पाईक होते. त्यांनी अखेरपर्यंत काँग्रेसचा विचार सोडला नाही. गोरगरिबांना मदत करणारे व समाजात उत्तम प्रतिमा असणारे सुभाष महाडिक यांनी काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी मोठे प्रयत्न केले होते. सुधीर दांडेकर यांनी सुभाष महाडिक हे जनतेमधील नेतृत्व होते.त्यांनी आपले मित्र परिवार व ग्रामस्थ यांच्यावर खूप प्रेम करून त्यांना आपलेसे केले होते.सर्वांशी मिळून मिसळून वागणारे एक आदर्श नेतृत्व असल्याचा उल्लेख यावेळी त्यांनी केला.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे दिवेआगर, ता. श्रीवर्धन, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे मुळ मालक श्रीमती. विनय अजय गुप्ता व इतर यांचे सामाईक मालकी वहिवाटीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | गट नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| दिवेआगर | ५१५ | ०.३९.७०<br>०.००.००<br>०.३९.७० या पैकी<br>०.१५.४४ | ०.९९ |

वरील वर्णन केलेल्या मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकती मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकती संबंधात कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क, कुणीही सदर मिळकतीचे मुळ मालकांना बयाणा रक्कम दिली असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खाली सही करणार यांचे कडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

माणगांव — सही/-
ता. २०/०८/२०२५ — **ॲड. एस. एस. दसवते**
गाळा नं ०८, दत्तकृपा बिल्डींग,
नविन तहसिलच्या बाजुला
कालव्याच्या मागे, उतेखोल,
ता. माणगांव, जि. रायगड

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र/ करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (हे.आर.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | उलवे २०१० | तरघर १०९ | ४७/१<br>४७/५<br>४२/१+<br>+५+६<br>+७/२ | ०-२५-०<br>१-०६-० | ११५० चौ.मी. पैकी १५० | उलवे नोड येथील भूखंड क्र.८A, सेक्टर-१८, क्षेत्र-४४९.५६ चौ.मी. | मूळ भूधारक **कै. महादेव काळया मोकल (मयत), कै. आनंदी उर्फ आनंदीबाई महादेव मोकल (मयत), कै. नामदेव महादेव मोकल (मयत) व कै. शैलेश नामदेव मोकल (मयत) यांचे वारस** १) श्री. राजेश नामदेव मोकल, २) श्रीमती लक्ष्मीबाई नामदेव मोकल, ३) श्रीमती सुषमा शैलेश मोकल, ४) कु. दिक्षा शैलेश मोकल व ५) कु. महर्षी शैलेश मोकल | |
| २ | खारघर १८३ | खारघर -२७ | १५५/१८ | ०-१०-४ | १२९० चौ.मी. पैकी ४४९.८६ वाटप पूर्ण ८४० चौ.मी. | भूखंड क्र.२३१, सेक्टर-१०, क्षेत्र - ८४० चौ.मी. | कै.शेवंताबाई अर्जुन ठाकूर (मयत) वारस-<br>१)श्री.भगवान अर्जुन ठाकूर<br>**२)विष्णू अजुर्न ठाकूर (मयत)**<br>२.१) श्रीमती. जनाबाई विष्णु ठाकूर<br>२.२)श्री.गगन विष्णु ठाकूर<br>२.३)श्री.धमेंद्र विष्णु ठाकूर<br>२.४) श्री.अमृत विष्णू ठाकूर<br>२.५) श्रीमती. सुवर्णा चिंतामण गायकर<br>३) श्री.कैलास अर्जुन ठाकूर (मयत)<br>३.१) श्रीमती. कांता कैलास ठाकूर<br>३.२) तनुजा कैलास ठाकूर उर्फ सौ.तनुजा राहुल कोळी<br>**४)श्रीमती.जिजाबाई राम करावकर (मयत)**<br>४.१) श्री.संतोष रामचंद्र करावकर<br>४.२) सौ.सुगंधा राजाराम आलिमकर<br>४.३) सौ.सुनिता नारायण फडके<br>४.४) सौ.आशा साईनाथ पाटील<br>४.५) सौ.उषा कैलास म्हसकर<br>४.६) सौ.बबिता प्रल्हाद केणी<br>४.७) सौ.हिरा बाळकृष्ण भोईर<br>४.८) सौ.दिपाली विक्रम ठाकूर<br>५)श्रीमती.करूणा अर्जुन ठाकूर | निरंक |
| | | खारघर -३१८ | ३१४/३<br>३१४/९ | ०-०२-३<br>०-०२-५ | | | | |
| | | खारघर -३१८ | २९५/२<br>२००/१ ते ८ब | ०-२९-३<br>०-३८-४ | | | | |
| | | खारघर -२८ | १९८/४ | ०-०४-५ | | | | |
| | | खारघर -२८ | २०४/३ | ०-०८-१ | | | | |
| | | खारघर -४०७ब | २११अ/४ | ०-४९-५ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२२५/२०२५-२६

# रोह्यातील अनधिकृत टपऱ्या जमीनदोस्त

## ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेसमोर प्रशासन नरमले

**| धाटाव | प्रतिनिधी |**

**रोहा नगरपरिषद हद्दीतील म्हाडा वसाहती समोरील वादादित टपऱ्या अखेर बुधवारी (दि.२०) जमीनदोस्त करण्यात आल्या. पोलिसांच्या संरक्षणात सार्वजनिक बांधकाम विभागाने ही कारवाई केली आहे. यासाठी म्हाडा वसाहतीचे शेकडो रहिवासी रस्त्यावर उतरले होते. उपोषणाच्या ईशाऱ्यानंतर संबंधीत प्रशासनाला जाग आली आणि टपऱ्या हटविण्याची कारवाई करण्यात आली. त्यामुळे म्हाडा वसाहत ग्रामस्थ व महिलांच्या आक्रमक भूमिकेसमोर सार्वजनिक बांधकाम प्रशासन नरमले हेच अधोरेखीत झाले आहे.**



मागील काही महिन्यांपासून अनाधिकृत टपऱ्या हटवण्यासाठी ग्रामस्थांनी सर्वच प्रशासनाच्या दारी पायपीट केली होती. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी वारंवार दुर्लक्ष केले. तसेच, दुसऱ्यांची जबाबदारी म्हणत टोलवाटोलवी केली. त्यातून ग्रामस्थांची सहजनशीलता संपली होती. अखेर संबंधीत प्रशासन विरोधात ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत बुधवारी साखळी उपोषणाचा ईशारा दिला. सर्वांनीच हा अनाधिकृत टपऱ्यांचा मुद्दा लावून धरला. यावेळी 'कायदा बचाव, अतिक्रमण हटाव', 'कोण म्हणतोय हटणार नाय, हटविल्याशिवाय राहणार नाय', अशा घोषणा उपस्थित शेकडो म्हाडा वसाहत ग्रामस्थांनी दिल्या. त्याच घडामोडींचा धसका घेत अनाधिकृत टपऱ्या हटवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम प्रशासन पुढे सरसावले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागुल यांनी बुधवारी अतिक्रमण टपऱ्या हटविण्याचे स्पष्ट संकेत दिले होते. त्यानुसार अनाधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या. याठिकाणी म्हाडा वसाहतीचे शेकडो पुरुष, महिला उपस्थित होते. जोपर्यंत अनाधिकृत टपऱ्या जमिनदोस्त करीत नाहीत, तोपर्यंत जागेवरून हटणार नाहीत, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला होता.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने म्हाडा वसाहती समोरील अनधिकृत टपऱ्या हटवण्याची मोहीम हाती घेतली. त्यामुळे म्हाडा वसाहती समोरील अतिक्रमण टपऱ्या हटाव मोहिमेला बुधवारी यश आले. ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने अनाधिकृत टपऱ्या हटवाची मोहीम हाती घेऊन फत्ते केली.

### पूर्ण कारवाई होईपर्यंत उपोषण

**अनधिकृत टपऱ्यांच्या भरावामुळे पावसाचे पाणी वसाहतीत येत होते. तसेच, शालेय विद्यार्थी व नागरिकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत होते. ग्रामस्थांचे सामाजिक स्वास्थ बिघडले. याबाबत संबंधीत प्रशासनाजवळ पत्रव्यवहार केला. मात्र, कोणीच दखल घेतली नाही. अखेर ग्रामस्थांनी उपोषणाचे हत्यार उपसले, पत्रकारांनी हा मुद्दा लावून धरला. टपऱ्यांमुळे रहदारीला धोका निर्माण झाला होता. मात्र, आता म्हाडा वसाहतीचा रस्ता मोकळा झाला आहे. परंतु, पूर्ण कारवाई होईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ भिमेश भेकरे यांनी दिली.**

## निवडक



### इंदापूरमध्ये बिबट्याचा धुमाकूळ

**माणगाव :** तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावर असणाऱ्या कशेणे, इंदापूर परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहिवासी भागात संचार करत असलेल्या बिबट्याचे दोन-तीन वेळा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीकरणही झाले आहे. त्यामुळे लहान मुले, महिला तसेच गावातील नागरिकांना घराबाहेर पडणे धोकादायक झाले आहे. या बिबट्याने गावातील कुत्रे, मांजर नेऊन खाल्ले आहेत. त्यामुळे अधिकच भीती पसरले आहे. शेतकऱ्यांना देखील आपल्या शेतात जाणे मुश्कील झाले आहे. त्यामुळे या बिबट्याला सापळा लावून पिंजऱ्यात जेर बंद करून दूर जंगलात सोडावे अशी, विपुल उभारे यांनी माणगावचे वनक्षेत्रपाल प्रशांत शिंदे यांना लेखी दिलेल्या निवेदनातून दिली आहे.



### खरोशी गावातील जनजीवन विस्कळीत

**खरोशी :** सतत दोन-तीन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पेण तालुक्याला मोठा फटका बसला आहे. बाळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटल्याची माहिती मिळाली आहे. बाळगंगा नदीला आलेल्या पुरामुळे खरोशी गावात पुराचे पाणी शिरले. या परिस्थितीमुळे गावातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. स्थानिक प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून संपर्क तुटल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. सकाळी बाळगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने नदी किनारी असणाऱ्या घरांमध्ये पाणी घुसायला लागले आणि एकच तारांबळ उडाली. घरातील अस्ताव्यस्त पडलेला सामान इतरत्र हलवण्यात दमछाक झाली. अनेक गावकऱ्यांनी येऊन आसपासच्या घरांना मदतीचा हात दिला आणि त्यांना घरातून बाहेर काढले. घरातील सामानाचे नुकसान झाले आहे. नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असला तरी प्रशासन पूरग्रस्त भागावर लक्ष ठेवून आहे. पीडितांना आवश्यक ती मदत देण्यात येणार, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.



### ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान

**अलिबाग :** जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त रायगड फोटोग्राफर अँड व्हिडिओग्राफर असोसिएशनशी संलग्न असलेल्या आलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनच्यावतीने अलिबागमधील ज्येष्ठ छायाचित्रकार रवींद्र चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. त्यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनच्यावतीने दरवर्षी ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात येतो. यापूर्वी असोसिएशनच्यावतीने फोटोग्राफीतील दिग्गज कै. भाऊ सिनकर, वामन पाटील, नितीन पाटील, दादा नाईक, अशोक वडवळकर, सुरेश खडपे, सदानंद पाटील, रवींद्र घरत या ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला आहे. यावेळी ज्येष्ठ छायाचित्रकार सुरेश खडपे, रायगड फोटोग्राफर ॲड व्हिडिओग्राफर असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, सल्लागार सचिन आसराणी, गणेश जाधव, विजय पाटील आणि चव्हाण यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीत कोणतीही फुट नाही: मुंगाजी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

२७ गाव प्रकल्पग्रस्त समितीत कोणतीही फूट पडली नसल्याचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी पत्रकारांना सांगितले. यावेळी दि.बा. पाटील यांचेच नाव विमानतळाला लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. नवी मुंबई विमानतळ बाधित ग्रामस्थांनी एकत्र येत २७ गाव प्रकल्पग्रस्त समितीची स्थापना केली. या समितीमार्फत विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव लागावे, यासाठी गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. तसेच, ही समिती विमानतळावर स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिक कामाला लागले पाहिजेत ही भूमिका घेऊन त्यांनी त्या पद्धतीने काम देखील सुरू केले आहे. मात्र, एखाद दुसरी व्यक्ती राजकारण करून संघटनेला बदनाम करत असेल तर अशांवर कारवाईची मागणी केली असल्याचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी सांगितले. सचिन केणी यांच्याकडून केवळ सोशल मीडियावर राजीनामा पाठवण्यात आला आहे. या राजीनामा दिलेल्या पत्रातील बऱ्याचशा सह्या खोट्या असून त्यातील बहुतांशी संघटनेचे सदस्य नसल्याचे कार्याध्यक्ष रुपेश धुमाळ यांनी सांगितले. या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असल्याचे धुमाळ यांनी सांगितले.

## बेणसेतील घर कोसळले

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील बेणसे येथील यमुनाबाई घासे यांच्या घराची कौले सोसाट्याचा वादळवारा व मुसळधार पावसात कोसळली आहेत. यावेळी घरात वास्तव्यास असलेले काशिनाथ सुतार यांचे कुटुंब या आपत्तीत सुदैवाने बचावले आहे.



यावेळी गावकरी घटनेचे गांभीर्य पाहून मदतीला धावले. या दुर्घटनेत घरगुतील साहित्यांचे नुकसान झाले आहे. काशिनाथ सुतार यांनी सांगितले की, काही दिवस अतीमुसळधार पावसाने अक्षरश थैमान घातले आहे. शिहू बेणसे विभागात देखील दिवसरात्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. सोसाट्याचा वादळवारा व जोरदार पावसामुळे आम्ही राहत असलेल्या घराचा काही भाग कोसळला आहे.

त्यावेळी माझे कुटुंब गाढ झोपेत असताना मोठा आवाज झाल्याने ते सारेच हादरून गेले. या घटनेत कुणाला दुखापत झाली नाही; परंतु, साहित्याची मोडतोड झाली आहे. त्यामुळे शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी काशिनाथ सुतार यांनी केली आहे.

## गुरांचा गोठा जमीनदोस्त

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यात पडत असलेल्या पावसामुळे येथील घरांची, संरक्षण भिंतीची व शेतीच्या बांधबंदिस्तीची पडझड झाली आहे. त्यातच मंगळवारी (दि.१९) रात्री मुसळधार पडणाऱ्या पावसात पांगलोळी येथील शेतकरी गणू मांढरे यांचा गुरांचा गोठा जमीनदोस्त झाला. तसेच, पानवे बौद्धवाडी येथे पाणी साठवण टाकीची भिंत बांधकाम कोसळली. म्हसळा तालुक्यात आतापर्यंत १६ पक्क्या घरांची अंशतः तर ८ कच्च्या घरांची पडझड होऊन नुकसान झाले आहे. तीन ठिकाणी संरक्षण भिंत कोसळली आहे. एका ठिकाणी



शेतीचे बांध फुटले असल्याची नोंद म्हसळा महसूल विभागात केली असल्याची माहिती महसूल विभाग अधिकारी महेश रणदिवे यांनी सांगितले आहे.



## मच्छिमार बांधवांवर पुन्हा संकट

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

१ जुन ते ३१ जुलैपर्यंत मासेमारी करण्यास बंदी असल्यामुळे यादरम्यान सर्वच बोटी किनाऱ्यावरच होत्या. नारळी पौर्णिमाच्या दुसऱ्या दिवसापासून मासेमारीला सुरूवात करण्यात आली. परंतु, सतत पडणाऱ्या पावसामुळे त्यात समुद्र खवळत असल्याने मासेमारी गेलेल्या बोटीतील नाखवांनी व खलाशांनी आपल्या बोटी आगरदांडा बंदर व दिघी बंदरा जवळील समुद्रात नांगर टाकून उभ्या केल्या आहेत. यामध्ये राजपुरी, मुरुड, एकदरा, दिघी, वेरावळ गुजरात, रत्नागिरी पाजपंढरी, हरणाई, अलिबाग व वर्सोवासह बंदर भागातील अश्या १५० बोटी आहेत. या बोटी वादळ कमी होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. या वादाळामुळे कोळी मच्छिमार बांधवांवर पुन्हा संकट आले असून तो आर्थिक संकटात सापडला आहे.

## वरंध घाटात दरड कोसळली

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील वरंधा घाटात माझेरी गावाजवळ बुधवारी दरड पडण्याची घटन घडली. ती पडलेली दरड काढून वाहतूक पूर्व पदावर केली असली तरी गणेशोत्सव काळामध्ये या घाटातून वाहतूक चालू राहील का, असा सवाल कोकणवासीयांकडून प्रशासनाला विचारला जात आहे.

रायगड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते व महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यातच बुधवारी (दि.२०) सकाळी पुणे जिल्ह्याला जोडणाऱ्या वरंधा घाटातील माझेरी गावाजवळ दरड कोसळल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. मात्र, संबंधित प्रशासनाने स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने ही दरड हटवून वाहतूक पूर्ववत केली. मात्र, आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सव काळात हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पूर्ववत करेल का, असा सवाल गणेश भक्त विचारीत आहेत. तसेच, पुणे जिल्ह्यात चालू असणाऱ्या कामांमुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे.



त्यामुळे गणेशोत्सव काळामध्ये या रस्त्यावरून वाहतूक चालू करण्याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण गांभीर्याने घेईल का, असाही प्रश्न वाहतूकदारांना पडला आहे.

## माथेरानमध्ये झाड कोसळून वाहनांचे नुकसान

**| माथेरान | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्याने माथेरान येथे पुन्हा एकदा अनर्थ घडवला आहे. दस्तुरी नाक्यावरील बस स्टॉप शेजारील वाहन पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या तीन चारचाकी आणि एका दुचाकीवर मोठे झाड कोसळून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुदैवाने हा अपघात रात्री घडल्याने त्या ठिकाणी पर्यटक उपस्थित नव्हते, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. परंतु, जर हा प्रकार दिवसा घडला असता तर गंभीर दुर्घटना घडली असती म्हणून स्थानिकांचे म्हणणे आहे.

कर्जत तालुक्याला मागील ४८ तासांत मुसळधार पावसाने झोडपून काढले असून जीवनमान विस्कळीत झाले आहे. अशातच माथेरान येथे सर्वाधिक पावसाची नोंद झालेली आहे. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वाऱ्यामुळे येथील आल्हाद दायक वातावरण येथील पर्यटकांना सुखद वाटत असले तरी येथील झाडे उन्मळून पडल्याने नागरिकांचे नुकसान



होत आहे. दरम्यान, माथेरान वाहनतळावर उभ्या केलेल्या पर्यटकांच्या वाहनांवर झाड उन्मळून पडल्याने तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले असून एका स्कुटीचे नुकसान झाले आहे. गेल्या दीड महिन्यांतील ही चौथी घटना घडली असून आतापर्यंत दहा पेक्षा जास्त वाहनांचे नुकसान झालेले आहे. येथे गाडी पार्किंगसाठी प्रशासन शुल्क आकारत असूनही त्यांची सुरक्षा जाणिपूर्वक टाळली जात आहे का, असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला.

## युवा महोत्सवात जेएसएमचा दबदबा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित रायगड (दक्षिण विभाग) युवा महोत्सवात अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयाने अभूतपूर्व यश संपादन करत चॅम्पियनशिप पटकावली आहे. या महोत्सवात महाविद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांनी २५ स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन तब्बल १५ स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविली आहेत. युवा महोत्सवाची जिल्हास्तरीय फेरी मुरूडमधील अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयात सोमवारी (दि.१८) आयोजित करण्यात आली होती.



या महोत्सवात विविध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा झेंडा उंचावला आहे. कथाकथन, तालवाद्यवादन, मूकाभिनय, भारतीय समूहगीत गायनमध्ये द्वितीय तर नाट्यसंगीतमध्ये तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच, वादविवाद, लोकनृत्यमध्ये उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. श्रेया अधिकारी हिने एकूण पाच स्पर्धांमध्ये सहभाग घेत पाच पारितोषिके मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, डॉ. सोनाली पाटील, डॉ. प्रवीण गायकवाड, जिल्हा समन्वयक जयेश म्हात्रे, श्वेता पाटील यांनी सर्व विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


### खारघरकरांची पाण्याची गरज भागणार | पालिका करणार ५ कोटी खर्च

## ओवे धरणाचे पुनरुज्जीवन होणार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

**खारघरमधील नागरिकांची पाण्याची गरज भागवण्यासाठी ओवे येथील धरण पुनरुज्जीवनकरण्याचा निर्णय पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून घेण्यात आला आहे. या करता जवळपास ५.०८ कोटी रुपये खर्च केला जाणार आहे.**

खारघरमधील ओवे धरणाचे पूनरुज्जीवन करण्याची तसेच पांडव कडा येथून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करण्यासाठी या टिकाणी धरण बांधण्याची मागणी माजी नगरसेवक आणि पाणीपुरवठा समितीचे माजी सभापती निलेश बाविस्कर यांनी पालिकेकडे केली होती. बाविस्कर यांनी



केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत पालिकेकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे ओवे धरणाच्या जवळपासच्या गावांना तसेच खारघर शहरातील काही रहिवासी संस्थांना ०.७५ एमएलडी ते १.५ एमएलडी पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे मत बाविस्कर यांनी व्यक्त केले आहे.

खारघर वसाहती लगत असलेल्या ओवे गावात ०.१६ दश लक्ष घनमीटर एवढ्या क्षमतेचे लहान धरण आहे. महापालिका स्थापनेपूर्वी तळोजा ग्रामपंचायतीचे हे धरण होते. १९६२ साली बांधण्यात आलेल्या या धरणातून तळोजा ग्रामपंचायत मधील नागरिकांना पाणी पुरवण्यात येत होते. पालिकेच्या स्थापने नंतर रायगड जिल्हा परिषदेने या धरणाकडे दुर्लक्ष केल्याने धरणातील पाणी वापराविना वाया जात होते. पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ओवे धरण खोलीकरणाचा सध्या कोणताही प्रस्ताव नसला तरी धरण पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे.

### या करता होणार निधीचा वापर

**पालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीतून २० अश्वशक्तीचा सबमर्सिबल पंप, ३५० मीटर लांब आणि १५० मिमी व्यासाची कच्च्या पाण्याची पाईपलाईन, १.५ लिटर क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प आणि १.७४० किलोमीटर लांबीची २०० मिमी व्यासाची पाईपलाईन सोबत एक पॅनेल चेंबरचा समावेश आहे.**

## सेवादल आळीवर तिसऱ्या डोळ्याची नजर



**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहे शहरातून मुरुड व अन्य पर्यटन स्थळी जाण्यासाठी सेवादल आळी हा परिसर जवळचा आणि सोयीचा असल्याने या भागात नेहमीच पर्यटकांची वर्दळ असते. त्यामुळे या आळीवर आता तिसऱ्या डोळ्याची नजर असणार आहे. कै. जनार्दन मारुती शेडगे ट्रस्टकडून माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्या हस्ते सेवादल आळी सन्मित्र मंडळाला ८ सीसीटीव्ही कॅमेरे प्रदान करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण आळी आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेखाली येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत फायदेशीर आणि सोयीस्कर ठरणार आहे. यावेळी मंडळाचे अध्यक्ष मोहीत ताम्हणे, राहुल कुलकर्णी, दिलीप मेकडे, रवींद्र मगर, रमेश कुळकर्णी, सुधीर गोळे, प्रफुल्ल ताम्हणे, संदीप सावंत, हरी मेकडे, विजय सावंत, संजीव कुळकर्णी आदी उपस्थित होते.

# नेमेचि न येणारा पाऊस

हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा, नेमेचि येतो मग पावसाळा अशी एक जुनी कविता होती. पण आता पावसाचा कसलाच नेम राहिलेला नाही. कारण, मुळात माणसाचाच नेम आणि भरवसा राहिलेला नाही. किंबहुना, माणसाने हमखास वेडेविद्रे वागायचे आणि निसर्गाकडून मात्र वाटेल त्या अपेक्षा करायच्या असे अनेक वर्षांपासून चालू आहे. त्याचेच फटके त्याला मिळत आहेत व ते दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. सोमवारी व मंगळवारी राज्यभरात ठिकठिकाणी जी पुरासारखी स्थिती निर्माण झाली ती त्याचीच लक्षणे आहेत. वास्तविक हा ऑगस्ट महिना आहे. त्यामुळे या काळात पाऊस बरसतोच. हवामान विभागाने तसा रेड एलर्टही दिला होता. त्यानुसार, मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात तुफान पाऊस झाला. पण हा पाऊस इतकाही नव्हता की व्यवस्था कोलमडून पडाव्यात. मुंबईमध्ये खूप वर्षांपूर्वी २६ जुलैला एका तासात नऊशे मिलीमीटर पाऊस झाल्यामुळे पूर आला. पण काल तर सोमवार सकाळ ते मंगळवार सकाळ या चोवीस तासात मिळून तीनशे मिलीमीटर पाऊस झाला. पण इतक्या पावसानेही मुंबईचे कंबरडे मोडले. लोकल सेवा बंद पडल्या. रस्त्यांवर व घरांमध्ये २६ जुलैची आठवण करून देईल असे पाणी भरले. बेस्ट बसेस पाण्यात बुडाल्या.वसई, पालघर वगैरे परिसराला अधिक फटका बसला. तेथे पावसाचे पाणी आणि समुद्राच्या भरतीमुळे खाडीतून येणारे पाणी यांचे एकत्रीकरण झाले की फटका बसतोच. तसा तो बसला. मुंबईच्या पूर्व उपनगरांपैकी कुर्ला, चेंबूर आणि ठाणे शहर यांना मोठा फटका बसला. नीट पाहिले तर असे लक्षात येईल की, मुंबईतला विकास म्हणून जो काही चालू आहे त्यातला पुढचा टप्पा याच भागात सर्वाधिक प्रमाणात राबवला जाणार आहे. इथेच धारावीचा विकास होणार आहे. तिथे अतिउंच इमारती उभ्या राहणार आहेत. पूर्व व पश्चिम यांना जोडणारे तमाम उड्डाणपूल याच भागात आहेत व सर्वात महत्वाचे म्हणजे याच भागातील मिठागरांच्या जमिनीवर बिल्डरांचा डोळा आहे. यातली काही जमीन धारावीतील पुनर्वसनासाठी अदानीला मिळण्याची शक्यता आहे. कुर्ल्यातील दूध डेअरीची मोकळी जागा व काही इमारती अदानीला देऊन झालेल्या आहेतच. आरे आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान नष्ट करून तिथे वारेमाप रस्ते, इमारती इत्यादी करण्याचे नियोजन चालू असून यातली देखील काही जमीन अदानीला भेट झालेली आहे.

## वसईचा भ्रष्टाचार

थोडक्यात जितक्या म्हणून मोकळ्या जागा आहेत त्या व्यापून टाकायच्या आणि त्यांनाच विकास म्हणायचे हे महायुतीच्या सरकारचे ध्येय आहे. तिकडे वसई व पालघरमध्येही हेच घडणार आहे. आधी वाढवण बंदर विकसित करायचे आणि ते मुंबई-आग्रा, मुंबई-पुणे आणि मुंबई-गोवा या तीन मार्गांना जोडायचे असा जंगी कार्यक्रम आहे. मुळात जेएनपीटी बंदर असताना वाढवणची गरज आहे का हा महत्वाचा सवाल आहे. पण अदानीने ठरवलेले असल्याने आपल्या दोस्ताचा हट्ट पुरवण्यासाठी मोदी कोणत्याही थराला जाणार हे उघड आहे. त्यानंतर जे रस्त्यांचे जाळे उभारले जाणार आहे त्यात हजारोंची बागायती शेती, जंगलाखालील जमीन आणि वसईच्या मिठागरांसारख्या मोकळ्या जागा बळी पडणार आहेत. गेल्या आठवड्यात वसईचे माजी आयुक्त अनिल पवार या आयएएस अधिकाऱ्याला इडीने अटक केली. डम्पिंग ग्राऊंड आणि सांडपाणी निचरा प्रकल्पासाठीच्या जमिनीवर तब्बल ४१ इमारती उभ्या करण्यात आल्या. त्या व इतर प्रकरणांमध्ये पवार आणि टाऊन प्लॅनिंगचे रेड्डी नावाचे उपसंचालक यांना इडीने पकडले. इमारतींना परवानगी देताना पवार प्रतिचौरस फूट २५ रुपये तर रेड्डी हे दहा रुपये घेत असत. या भ्रष्टाचारातूनच अंदाधुंद बांधकामे होतात व पावसाचे पाणी अडवतात. आता तर अनेकविध हायवे, जोडरस्ते, उड्डाणपूल इत्यादींची कामे काढून अधिकृतरीत्याच इंच न इंच बांधकामे करण्याचा चंग सरकारने बांधला आहे. हे कमी म्हणून संजय गांधी उद्यानाच्या खालून बोगदे काढून बोरीवली ते ठाणे असा रस्ता केला जायचा आहे. अलिबाग ते विरार असा रस्ताही याच नाजूक प्रदेशात निर्माण व्हायचा आहे. या सर्व रस्त्यांमधून चारचाकी मोटारवाल्यांना तुफान वेगात इकडून तिकडे जाता येईल हे खरे आहे. पण पावसाच्या काळात त्या भागांमध्ये राहणाऱ्यांना दरवर्षी जीव मुठीत घेऊन राहावे लागेल किंवा तेथून कायमचे विस्थापित व्हावे लागेल. शिवाय ही स्थिती सध्या एक-दोन दिवसांपुरती होते आहे. जसजशी बांधकामे वाढतील तसतशी ही स्थिती कदाचित पावसाचे चारही महिने पाहायला लागू शकते. निव्वळ गेल्या वीस वर्षांचा विचार केला तरी पावसाने आपले वेळापत्रक व रंगरूप कितीतरी बदललेले आहे. एका तासात एका वर्षाचा पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत. अशा घटनाही एखादे वेळेस नव्हे तर पुन्हा पुन्हा घडू लागल्या आहेत. काही वर्षांपूर्वी मुंबईचे तत्कालीन आयुक्त इक्बाल चहल यांनी येत्या पन्नास वर्षांमध्ये नरिमन पॉईंट पाण्याखाली जाईल असे भाकित केले होते. सध्या आपण विकासाचा जो मार्ग अवलंबला आहे तो पाहता हे भाकित येत्या दहाच वर्षात खरे झाले तरी आश्चर्य वाटू नये अशी अवस्था आहे.

## मुंबईबाहेरही तेच

मुंबईबाहेरही सर्वत्र हेच घडते आहे. पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर ही मोठी शहरे तर सोडाच पण पेण, पनवेल, नागोठणे इथे ज्या तऱ्हेचा सैतानी विकास होत आहे तो पाहता लवकरच त्यांची अवस्था मुंबईसारखी होणार आहे. मुंबईत काल रस्त्यांवर पाणी भरले म्हणून उंच पुलावरून चालणाऱ्या मोनोरेलकडे सर्वांनी धाव घेतली. एरवी ही मोनोरेल रिकामी धावते. मध्यंतरी ती बंद पडेल अशी अवस्था होती. म्हणजे तिच्यापायी झालेली बांधकामे व खर्च निरुपयोगी किंवा उपद्रवी असल्याचे आधीच सिध्द झाले आहे. काल लोकांनी मोनोरेलला गर्दी केल्यावर तिने ऐन वळणात बसकण मारली. ती पुढे धावेना. बंद डब्यामध्ये सात-आठशे लोक अडकून पडले. खाली पाण्यात नाही तर इकडे घुसमटून मरायची वेळ आली. अखेर त्यांना रेल्वेच्या डब्याच्या काचा फोडून कसेबसे बाहेर काढण्यात आले. ही आपल्या आधुनिक यंत्रणांची व समाजाची अवस्था आहे. मोनोरेलमध्ये ठराविक क्षमतेहून अधिक लोकांनी प्रवास करू नये यावर नियंत्रण ठेवणारी काहीच यंत्रणा नाही हे कालच्या प्रसंगाने सिध्द झाले. आणि हे महायुतीचे सरकार दरवाजे बंद करणाऱ्या लोकल रेल्वे आणू असे सांगत आहे. एकूण आपल्याकडे कोणत्याच प्रकारचे कसलेही नियोजन नाही. केवळ श्रीमंत देशातील कंपन्यांनी आपल्या गळयात मारले की ते विकास प्रकल्प आपण स्वीकारतो. आपल्या गरजा, आपले उन, आपला पाऊस यांचा कसलाही विचार होत नाही. दरम्यान, कालच्या पावसाने तिकडे मराठवाड्यातही कहर केला. नांदेडमध्ये हसनाळ गावात ढगफुटी झाली. पाच जण मरण पावले. शेकडो लोकांची घरेदारे उद्ध्वस्त झाली. सरकारच्या अंदाजानुसार सुमारे दहा ते बारा लाख एकर शेती पाण्याखाली गेली आहे. यंदा पाऊस दरवर्षीपेक्षा पंधरा दिवस अगोदर आला. जून महिन्यातच त्याने अनेक ठिकाणी पूर्ण हंगामाची सरासरी पूर्ण केली. पण जुलै महिन्यात त्याने ओढ दिली. आतादेखील सप्टेंबरमध्ये पुन्हा सरासरीहून अधिक पाऊस होण्याची भाकिते हवामान खात्याने केली आहेत. या स्थितीत कालचेच किंवा कालच्याहून अधिक गंभीर प्रकार मुंबईत वा राज्यात इतरत्र होण्याची भरपूर शक्यता आहे. आपण निसर्गातले एक घटक आहोत आणि अजूनही निसर्गावर अवलंबून आहोत याची जाणीव भारतात तरी किमान पावसाळा या ऋतूतच होत असते. मात्र असे कितीही धोक्याचे इशारे पावसाने दिले तरी आपण ते मनावर घेण्यास तयार नाही. हे अत्यंत धोकादायक आहे.

विचार

# आयोगावरील आक्षेपांमुळे फसले राहुल गांधी

***घेतलेल्या आक्षेपांबाबत निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना विहित प्रक्रियेनुसार औपचारिक तक्रार दाखल करण्यास किंवा प्रतिज्ञापत्रासह कागदोपत्री पुरावे सादर करण्यास सांगितले. निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीबद्दल काही तक्रार असेल तर पुराव्यानिशी तक्रार करून पुरावे द्यायचे असतात. निवडणूक आयोगावर विश्वास नसेल, तर राहुल यांना न्यायालयात जाण्याचा पर्याय होता. त्यांनी तो अवलंबला नाही.***




अजय तिवारी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेतली आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदार घोटाळा झाल्याचा मोठा आरोप केला. निवडणूक आयोगाने त्यांचे हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. जुन्या आणि आधीच नाकारलेल्या दाव्यांची राहुल पुनरावृत्ती करत आहेत. निवडणूक आयोगाने गांधींना विहित प्रक्रियेनुसार औपचारिक तक्रार दाखल करण्यास किंवा प्रतिज्ञापत्रासह कागदोपत्री पुरावे सादर करण्यास सांगितले; परंतु लोकसभेत घेतलेली शपथ हेच प्रतिज्ञापत्र असल्याचे ते सांगत आहेत. वास्तविक, काही तक्रार असेल तर पुराव्यानिशी तक्रार करून पुरावे द्यायचे असतात. निवडणूक आयोगावर विश्वास नसेल, तर राहुल यांना न्यायालयात जाण्याचा पर्याय होता. तो त्यांनी अवलंबला नाही. राहुल यांनी ज्या कर्नाटकमधील एका मतदारसंघातील उदाहरणे दिली, त्याबद्दल कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कर्नाटक, महाराष्ट्र आणि हरियाणाच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनीही राहुल यांना पत्र लिहून आरोपांची माहिती आणि शपथेखाली पुरावे देण्यास सांगितले. तक्रार आणि पुरावे असतील, तर निवडणूक आयोगाला चौकशी करता येईल; परंतु राहुल तक्रार द्यायला तयार नाहीत. निवडणूक अधिकाऱ्यांच्या पत्रात राहुल यांना मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम २०(३)(ब) अंतर्गत शपथपत्रावर स्वाक्षरी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे अधिकारी सर्व पुरावे गोळा करू शकतील आणि आरोपांची अधिकृत चौकशी सुरू करू शकतील.

मतदार नोंदणी नियम, १९६० चा नियम २० 'दावे आणि आक्षेपांची छाननी' करण्याशी संबंधित आहे. ही प्रक्रिया मसुदा मतदार यादी प्रकाशित झाल्यापासून केवळ ३० दिवसांच्या आत लागू होते. नोंदणी अधिकाऱ्यांना मतदार यादीशी संबंधित कोणत्याही दाव्याची किंवा आक्षेपांची सारांश चौकशी करावी लागते. ही प्रक्रिया मतदार यादीत नावे जोडण्याशी किंवा विद्यमान नोंदींवर आक्षेप घेण्याशी संबंधित आहे आणि मतदार यादी प्रकाशित झाल्यापासून केवळ ३० दिवसांच्या कालावधीसाठी लागू आहे. नोंदणी नियम, १९६० चे थोडक्यात वाचन केल्यास स्पष्ट होते की नियम २० अंतर्गत केलेल्या छाननीसह ही संपूर्ण प्रक्रिया ही एक प्राथमिक पायरी आहे, जी नियम २२ अंतर्गत 'यादीच्या अंतिम प्रकाशना'मध्ये संपते. नियम २२(२) अंतर्गत मतदार यादी अखेर प्रकाशित झाल्यानंतर पुढील निवडणुकीसाठी मतदारसंघाची मतदार यादी असते. निवडणुकीनंतरच्या परिस्थितीत (जसे की सध्याची परिस्थिती) नियम २० लागू असणे प्रक्रियात्मकदृष्ट्या कमकुवत होते. नियम २२ अंतर्गत अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर नियम २० अंतर्गत असलेल्या विशिष्ट प्रक्रिया त्या निवडणूक चक्रासाठी प्रभावी रहात नाही. अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर वैध मानली जाते आणि कोणतेही आव्हान न्यायालयीन कार्यवाहीच्या अधीन असते. २०२४ च्या लोकसभा निवडणुका आधीच पूर्ण झाल्या असल्याने मतदार यादीच्या अंतिम स्थितीबद्दलच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेल्या नियमाचा वापर प्रक्रियात्मकदृष्ट्या अनियमित मानला जाऊ शकतो.

केलेल्या आरोपांबद्दल राहुल गांधी नियम २० अंतर्गत संबंधित पुरावे सादर करू शकतात. राहुल यांनी केलेल्या दाव्यांचे पुरावे निवडणूक आयोगाकडे नसल्याने आरोपांची अधिकृत चौकशी सुरू करण्यापूर्वी डेटा तपासण्याची जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीची त्यांना आवश्यकता आहे. विशेष म्हणजे, नोंदणी नियम, १९६० च्या नियम १७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की विहित कालावधीत किंवा विहित स्वरूपात आणि पद्धतीने दाखल केला न गेलेला कोणताही दावा किंवा आक्षेप नोंदणी अधिकारी ताबडतोब नाकारतील. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली, तर राहुल यांचे आरोप आणि निवडणूक आयोगाच्या मर्यादा लक्षात येतात. त्यातही राहुल यांनी आरोप सिद्ध करण्यासाठी शपथपत्र दाखल केले, तरी कायद्यानुसार, निवडणूक आयोग नियम १७ अंतर्गत त्याच्या बंधनामुळे त्यांचा दावा नाकारण्यास बांधील आहे. फसवणूक किंवा गैरव्यवहाराच्या आधारावर निवडणूक निकालाला आव्हान देण्याचा एकमेव कायदेशीर मार्ग म्हणजे निवडणूक याचिका दाखल करणे, जी लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत ४५ दिवसांच्या आत उच्च न्यायालयात दाखल करायची असते. ही मुदतदेखील आता संपली आहे. आता नियम २० किंवा निवडणूक याचिकेचा मार्ग कायदेशीररित्या उपलब्ध नाही. नोंदणी नियम, १९६० मध्ये नमूद केलेल्या ३० दिवसांची अंतिम मुदत संपल्यामुळे आणि 'आरपीए' मध्ये नमूद केलेल्या ४५ दिवसांच्या कालमर्यादेमुळे, राहुल यांनी केलेल्या मतदार फसवणुकीच्या दाव्यांची अधिकृत चौकशी करण्यासाठी कोणताही उपाय उपलब्ध नाही.

अंतिम मुदत संपल्यानंतर आणि अधिकृत तक्रार नसतानाही प्रक्रियात्मक औपचारिकतेच्या पलीकडे जाणाऱ्या मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे एक खोल संवैधानिक अधिकार आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाला मतदार याद्या तयार करणे आणि निवडणुका आयोजित करण्याचे 'पर्यवेक्षण, निर्देश आणि नियंत्रण' करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी निवडणूक आयोगाला 'पूर्ण अधिकार' दिले आहेत. एम. एस. गिल विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त (१९७८) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की स्पष्ट वैधानिक तरतुदी अस्तित्वात असतील तेथे आयोगाने अशा तरतुदींनुसार काम करावे. याचा अर्थ असा की कोणतेही प्रतिज्ञापत्र नसले तरी गंभीर आरोप सार्वजनिक झाल्यास अंतर्गत चौकशी करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. जेणेकरून जनतेचा विश्वास कायम राहील, दोषी घटकांची ओळख पटेल आणि भविष्यासाठी मतदार यादी स्वच्छ होईल. याचा अर्थ असा की प्रतिज्ञापत्राअंतर्गत औपचारिक तक्रार सादर केली गेली नाही तरी, निवडणूक आयोग गंभीर निवडणूक गैरव्यवहाराच्या आरोपांची चौकशी करण्याच्या कर्तव्यापासून मुक्त नाही. कलम ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाचे सर्वोच्च कर्तव्य म्हणजे स्वतःच्या संस्थात्मक हेतूंसाठी तथ्ये पडताळण्यासाठी अंतर्गत चौकशी करणे. जनतेचा विश्वास राखण्यासाठी, खटल्यासाठी संभाव्य गुन्हेगारी वर्तन ओळखण्यासाठी आणि भविष्यात मतदार याद्यांच्या शुद्धीकरणासाठी सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी हे आवश्यक असेल.

राहुल यांनी मतदार यादीमध्ये फेरफार आणि मतचोरीचे गंभीर आरोप केले होते; परंतु याबाबत त्यांच्याच पक्षाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर त्यांच्या जुन्या मित्र पक्षाकडून धक्कादायक आरोप केले गेल्याने राजकीय खळबळ उडाली. भाजप आता याला राहुल गांधींचे 'सर्वात मोठे स्व-ध्येय' म्हणत आहे. हे प्रकरण २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत सिद्धरामय्या यांच्या बदामी मतदारसंघातून झालेल्या विजयाबद्दल आहे. माजी केंद्रीय मंत्री आणि सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी सी. एम. इब्राहिम यांनी अलीकडेच आरोप केला की त्यांनी आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते बी.बी. चिम्मनकट्टी यांनी मिळून तीन हजार मते खरेदी करण्यास मदत केली, जेणेकरून सिद्धरामय्या आपली जागा वाचवू शकतील. मनोरंजक गोष्ट म्हणजे त्या निवडणुकीत त्यांच्या विजयाचे अंतर फक्त १,६९६ मते होते, तर 'नोटा'ला २,००७ मते मिळाली. म्हणजेच त्यांच्या विजयाचे अंतर 'नोटा'पेक्षाही कमी होते. इब्राहिम यांच्या मते, सिद्धरामय्या यांनी स्वतः या मतांच्या खरेदीसाठी पैसे दिले होते. या खुलाशामुळे भाजपला राहुल यांच्यावर निशाणा साधण्याची मोठी संधी मिळाली. भाजपचा आरोप आहे की, ही केवळ २०१८ ची बाब नाही. २००६ च्या चामुंडेश्वरी पोटनिवडणुकीतही असेच काहीसे घडले होते. त्यात सिद्धरामय्या काँग्रेसमध्ये सामील झाल्यानंतर फक्त २५७ मतांच्या फरकाने विजयी झाले. तेव्हाही केंद्रात काँग्रेस सत्तेत होती आणि तेव्हाही मते खरेदी झाली का आणि कोणत्या अधिकाऱ्यांनी निवडणुका घेतल्या याची चौकशी झाली पाहिजे. एकंदरीत, राहुल यांचा निवडणूक आयोगावरील कथित बॉंब फुसका ठरण्याची शक्यता आहे.

चर्चा आजची

# दादागिरी कसली करताय?

राकेश लोहार

शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि जनतेच्या हिताच्या प्रश्नांवर शेतकरी कामगार पक्षाने विधिमंडळात असो वा रस्त्यावरची लढाई लढून आवाज उठविला आहे. म्हणून रायगडसह राज्याच्या राजकारणात पक्षाच्या आवाजाची धार कायमच वरचढ राहिली आहे. चळवळीचा वारसा लाभलेल्या या पक्षाच्या माध्यमातून आणि पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी रायगडातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. रंजल्या-गांजलेल्यांना आधार देण्याचे काम, तरुणांच्या हाताला काम देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य चित्रलेखाताईंच्या माध्यमातून झालेले आहे, होत आहे. त्यामुळे जेथे अन्याय, तेथील जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी ताई नेहमीच एक पाऊल पुढे असतात. समाजकारण, राजकारण, सहकार, उद्योग व व्यवसाय, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत उत्तुंग यश मिळविणारं हे व्यक्तिमत्त्व. राजकारणात येऊ पाहणाऱ्या महिलांसाठी आदर्शवत आहेत. विरोधाला विरोध म्हणून त्यांनी कधीच राजकारण केलेले नाही, करतही नाहीत. परंतु, त्यांच्या झंझावाताची विरोधकांनी नेहमीच धास्ती घेतलेली आहे. आणि, मग इथूनच विरोधकांच्या घाणेरड्या राजकारणाला सुरूवात होते.

मंगळवारी मुरुड तालुक्यातील मिठेखार येथे प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे दरड कोसळून एका वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला. घटनेचे गांभीर्य ओळखून दरडग्रस्त कुटुंबाला आणि गावकऱ्यांना आधार देण्यासाठी चित्रलेखाताई जातीने हजर झाल्या. दरम्यान, त्यांनी प्रशासनाविरोधात व्यक्त केलेला संताप, चीड याच भावना येथील ग्रामस्थांच्या आहेत. तोच जनआक्रोश ताईंनी व्यक्त केला. आज लोक रस्ता नाही म्हणून चिखलातून प्रवास करत आहेत. अनेकांना यामुळे कंबरदुखी, अंगदुखी याचा त्रास होऊ लागला आहे. गरोदर स्त्रिया, शाळेतील मुले धोकदायकरित्या प्रवास करत आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी आज चित्रलेखाताई जेव्हा प्रशासनाला भिडून प्रश्न विचारत होत्या, तेव्हा आपली पोलखोल होईल म्हणून ताईंवर पाठीमागून हल्ला करण्यात आला. दरम्यान, यावेळी उपस्थित शिंदे शिवसेनेच्या नेत्या म्हणविणाऱ्या काही महिला नेत्यांनी दादागिरी करण्याचा प्रयत्न केला. अरे, दादागिरी करायची तर कामात दिरंगाई करणाऱ्या प्रशासनावर करा, रस्ते असो वा संरक्षक भिंतींचे, प्रशासकीय इमारतींचे, पुलांचे आदींचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर करा... तिथे का गप्प बसता? जनतेचे प्रश्न सोडविणे तर दूरच; सर्वसामान्य भोळ्या भाबड्या जनतेला दिलेली आश्वासनेसुद्धा आपण पूर्ण करु शकला नाहीत. ज्यांच्या जीवावर हे राजकारण सुरू आहे, त्यांना वाऱ्यावर सोडून आपण मस्त ऐषोरामात मिरवत आहात, आम्हीच जनतेचे वाली म्हणवून घेत आहात. लाज वाटायला हवी! आज आपणच राजकारणाची पातळी पार रसातळाला नेऊन ठेवली आहात. पण, त्याचे सोयरसूतकही आपणास नाही, याचीच कमाल वाटते.

अशा घाणेरड्या राजकारणात म्हणूनच चित्रलेखाताई उजव्या ठरतात. नेहमीच सर्वसामान्यांच्या न्यायासाठी लढणाऱ्या ताईंना आजही मिठेखार येथे शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून गावाला न्याय मिळवून देण्यात येईल, तातडीने दरडग्रस्तांचे स्थलांतर करून संरक्षक भिंत बांधण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, शेकापकडून मदतीचा हात दिला जाईल, ग्रामस्थांच्या सर्व मागण्या मान्य करण्यास प्रशासन व सरकारला भाग पाडू, अशी ग्वाही देत मिठेखारवासियांना आधार देण्याचे काम केले. दरम्यान, ही तर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांना, दादागिरीची भाषा करणाऱ्यांना एक चपराकच म्हणावी लागेल. कारण, सर्वपक्षीय राजकीय मंडळी येथे असताना, त्यातच सत्ताधारीच उपस्थित असतानाही मदत देण्याबाबतीत कोणी ब्र काढला नाही. पण, उदार मनाने ताईंनी तेथे ग्रामस्थांना दिलेला आधार सर्वांचेच लक्ष वेधून गेला, हेही नसे थोडके. त्यांनी दरडग्रस्तांच्या राहण्या-खाण्याचीच तात्काळ जबाबदारी उचलून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्याच्या सूचनाच आपल्या कार्यकर्त्यांना दिल्या. सत्ताधारी फक्त दादागिरीची भाषा करणार काय, तुमची काहीच जबाबदारी नाही का? याचीच चर्चा आज सबंध तालुक्यात नव्हे तर, जिल्हाभर होत आहे. आमदारसाहेब तर तालुक्याच्या विकासाच्या बाता आपल्या भाषणातून नेहमीच ठोकत असतात. विकास सोडाच; परंतु चांगले रस्ते जर सामान्य जनतेला देता येत नसतील, तर विकास शोधायचा तरी कुठे? तरुणाईला चांगली दिशा देता येत नसेल, हाताला काम देता येत नसेल, तर फुशारक्या मारता कशाला? पण, याउलट आज शेतकरी कामगार पक्षाला सुसंस्कृत चळवळीचा वारसा आहे, तरुणाईला स्वतःच्या पायावर उभे करण्याची क्षमता आहे, त्यांना चांगल्या नोकऱ्या देण्याची ताकदही आहे. आणि, दिलेले शब्द पूर्ण करण्याची जाणीव आहे. म्हणूनच आज सामान्यांना पक्षाबद्दल आस्था आहे. दादागिरीची भाषा करण्यापेक्षा सर्वसामान्य जनतेला काय हवेय, ते उघड्या डोळ्यांनी कधी तरी पाहणार आहात की नाही? की, जनता मरतेय ती मरु दे, अशा पद्धतीनेच आपण कायम वागणार आहात का? आपण करत असणारे राजकारण, आपली भाषा एक ना एक दिवस आपल्यालाच संकटात टाकणार, एवढे मात्र नक्की! आज सत्ता आहे म्हणून वाट्टेल ते कराल, वाट्टेल तसे वागालही. परंतु, काळ, वेळेत जसा बदल होतो, तशीच सत्ताही येते-जाते, त्यामुळे सत्तेची किंमत आपल्याला मोजायला लागेल, हे मात्र तितकेच खरे!

लोकसंसद

## मोनो रेल्वे तोट्याच्या गर्तेत



एकीकडे पावसाने मुंबईच्या नाकी नऊ आणले असतानाच मुंबईतली मोनो रेल्वे क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांनी खचाखच भरली आणि अतिवजनामुळे मैसूर कॉलनी आणि भक्ती पार्क या स्थानकांदरम्यान एका वळणावर तीन तास अडकून पडली. या मोनोरेलमधील वीजप्रवाह खंडित झाल्याने एसी बंद झाले आणि ५८२ प्रवासी अक्षरशः गुदमरले. बचाव पथकांनी क्रेनच्या मदतीने दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. मोनो रेल्वेची एकूण क्षमता १०४ टन आहे. मात्र गर्दीमुळे मोनो रेल्वेचे एकूण वजन सुमारे १०९ टनांपर्यंत वाढले. त्यामुळे मोनोसाठी अत्यावश्यक असलेला वीजपुरवठा खंडित होऊन मोनो जागेवरच थांबली असे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले. या घटनेमुळे मोनोरेल्वे पुन्हा एकदा प्रकाशझोतात आली. खरे तर ११ वर्षांपूर्वी सुरु झालेली आणि मुंबईच्या पूर्व भागातील चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक या २० किमीच्या मार्गावर वळणे वळणे घेत धावणारी, हिरव्या, निळ्या आणि गुलाबी अशा आकर्षक रंगांत नटलेल्या डब्यांची सुसज्ज व देखणी आणि देशातील एकमेव म्हणून मिरवणारी मोनो रेल्वे पाहताना आणि त्यातून प्रत्यक्ष प्रवास करताना सुरुवातीच्या काळात परदेशात फिरत असल्याचा भास व्हायचा आणि एक वेगळाच आनंद मिळायचा. मात्र २०१४ मध्ये मोठ्या थाटामाटात सुरू झालेली मोनोरेल गेल्या काही वर्षांत वारंवार होणारे अपघात, देखभालीच्या समस्या, चुकीचा मार्ग आणि प्रवाशांनी पाठ फिरवल्याने तोट्याच्या गर्तेत गेली आहे. वर्षाकाठी अंदाजे ५०० कोटी रुपयांच्या तोट्यात जाणाऱ्या मोनो रेल्वेचे भवितव्य अंधारात आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय स्मरण दिन आणि दहशतवादाच्या बळींना श्रद्धांजली

दहशतवादाच्या बळींना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि त्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी २१ ऑगस्ट रोजी दहशतवादाच्या बळींचा आंतरराष्ट्रीय स्मृतिदिन आणि श्रद्धांजली वाहण्याचा दिवस साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय दिनाचे मुख्य उद्दिष्ट दहशतवादाच्या बळींचा सन्मान करणे, त्यांचे स्मरण करणे आणि त्यांना श्रद्धांजली वाहणे हे आहे, एकजुटीने उभे राहून आणि त्यांच्या मानवी हक्कांना आणि मुलभूत स्वातंत्र्यांना प्रोत्साहन देऊन आणि त्यांचे संरक्षण करून. १८ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात फ्रान्समधील 'रेजिमे डे ला टेरेर' (दहशतीचे राज्य) चे वर्णन करण्यासाठी दहशतवाद हा शब्द प्रथम वापरला गेला. जागतिक स्तरावर शांततेसाठी सर्वात गंभीर धोक्यांपैकी एक म्हणून दहशतवादाचा निषेध करण्यात आला आहे. दहशतवाद हा राष्ट्र आणि त्याच्या समुदायातील सर्व प्रकारच्या सुरक्षिततेचे उल्लंघन करतो, परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, संपूर्ण जग दहशतवादी हल्ल्याचा परिणाम जाणवते आणि दहशतवादाच्या बळींसाठी एकत्र येते. यामुळेच दहशतवादाच्या बळींना श्रद्धांजली आणि श्रद्धांजलीचा आंतरराष्ट्रीय दिवस अविश्वसनीयपणे महत्त्वाचा ठरतो; जेणेकरून लोकांना वर्षानुवर्षे दहशतवादाचे परिणाम आठवत राहतील आणि दहशतवादाच्या शूर बळींचे स्मरण आणि ओळख सुरू राहील. हा दिवस दहशतवादाच्या बळींनी दिलेल्या त्यागाची आणि अतिरेकी कारवायांविरुद्ध सतत सतर्क राहण्याची गरज याची आठवण करून देतो. दहशतवादाच्या गंभीर परिणामांबद्दल आणि शांतता, एकता आणि सुरक्षा राखण्याचे महत्त्व याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा उद्देश आहे. दहशतवादामुळे ज्यांनी आपले प्राण गमावले आहेत त्यांना हा दिवस श्रद्धांजली वाहतो. हा दिवस दहशतवादाविरुद्ध जागतिक एकता आणि त्याच्या बळींना पाठिंबा देण्यास प्रोत्साहित करतो. हा दिवस वाचलेल्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या संघर्षांची दखल घेतो, त्यांच्या कल्याणासाठी आणि पुनर्वसनासाठी प्रोत्साहन देतो. दहशतवादाने प्रभावित देशांमध्ये राहणे म्हणजे दैनंदिन जीवनात सुरक्षिततेच्या सतत अनिश्चिततेचा सामना करणे. या क्षेत्रातील व्यक्ती हानीच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी मानसिक धोरणे विकसित करू शकतात. दहशतवादी हल्ल्यांनंतर व्यक्तींना पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, चिंता आणि मोठे नैराश्य येते. शिवाय, दहशतवादी हल्ल्यांमधून वाचलेल्या व्यक्तींना हल्ल्यानंतर मादक पदार्थांच्या गैरवापराच्या समस्या आणि मानसिक लक्षणे विकसित होण्याचा धोका जास्त असतो. दहशतवादी हल्ल्याच्या धोक्यात आल्याने होणाऱ्या प्रतिकूल मानसिक परिणामांचा धोका विशेषतः मुलांना असतो. दहशतवाद सर्व घोषणा, करार आणि अधिवेशनांमध्ये नमूद केलेल्या मानवी हक्कांच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करतो. मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा समानता, भेदभावापासून स्वातंत्र्य, जीवन, स्वातंत्र्य आणि वैयक्तिक सुरक्षिततेचे अधिकार तसेच गुलामगिरी, छळ आणि अपमानास्पद वागणुकीपासून संरक्षणाची हमी देते. दहशतवादाचा पर्यटकांच्या त्यांच्या गंतव्यस्थानाच्या निवडीबाबतच्या निर्णय घेण्यावर लक्षणीय परिणाम होतो आणि यजमान देशावर त्याचा तीव्र नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याव्यतिरिक्त, हा परिणाम बराच काळ टिकतो आणि पर्यटनाच्या मागणीवर देखील परिणाम करतो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२१ ऑगस्ट
१) श्री. दत्ताराम नारायण कोळी नवगाव, अलिबाग, २१-८-१९४९
२) श्री. लालसिंग शिवबालक कश्यप थळ, अलिबाग, २१-८-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**तरुण नंदकुमार सक्सेरिया मुंबई**

## सुवर्णकण



सुख दुःखाची ओळख नसणारे सुख हेच आत्मसुख आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**



## राजीव गांधी यांची जयंती

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहर काँग्रेसतर्फे माजी स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांची बुधवार (दि.२०) ऑगस्ट रोजी जयंती साजरी करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली, महाराष्ट्र प्रदेश प्रतिनिधी मुकेश सुर्वे, शहर अध्यक्ष अनंत देवळे तसेच युवानेते ॲड. सुरज पंडीत, संतोष सुरवसे, राजू पवार यांनी भाषणे झाली.

## साडेअठरा लाखांचा अपहार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

करंजाडे येथे रूम देतो असे सांगून तक्रारदारास कोणतीही रूम न देता तसेच त्यांच्याकडून घेतलेल्या जवळपास १८,५०,००० रकमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कैलासचंद्र प्रजापती यांना आरोपी केतन भानुशाली, एजंट मुकेशसिह आदींनी आपसात संगनमताने कैलासचंद्र यांना करंजाडे येथे रूम देतो असे सांगून त्यांना कोणतीही रूम न देता तसेच त्यांच्याकडून घेतलेल्या जवळपास १८,५०,००० रकमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीवर्धनमध्ये विजेचा खेळखंडोबा

## दुरुस्तीसाठी आठवड्यातून संपूर्ण दिवसभर पुरवठा खंडित

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**पावसाळ्यापुर्वी देखभाल दुरुस्तीची कामे केल्याचा दावा महावितरण कंपनीकडून करण्यात आला. मात्र हा दावा फोल ठरला आहे. श्रीवर्धनमध्ये महावितरण कंपनीचा सावळा गोंधळ सुरु असून अनेकवेळा नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागत आहे. विजेच्या खेळखंडोब्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.**



रायगड जिल्ह्यासह श्रीवर्धन तालुक्यात मुसळधार पाऊस रविवारी रात्रीपासून सुरू होता. परंतु पाऊस सुरू झाल्यानंतर नेहमीच महावितरणकडून वीजपुरवठा खंडित करण्यात येतो, याची अनेक कारणे असतात. काही वेळेला वीजा चमकत असतील किंवा वारा सुटला असेल तर महावितरण कंपनी वीजपुरवठा खंडित करते. तर अनेक वेळा पावसामुळे वीज वितरणात बिघाड होतात. पावसाळा सुरू होण्याअगोदर महावितरणाकडून अनेक वेळा पावसाळ्यापूर्वीची देखभाल व दुरुस्ती यासाठी आठवड्यातून दोन-दोन वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडित ठेवण्यात येतो.

काही वर्षांपूर्वी पाभरे येथून श्रीवर्धनकडे येणारी वीज वाहिनी हॉटेल रवी प्रभा या नेरूळ गावाजवळ असलेल्या ठिकाणापर्यंत भूमिगत टाकण्यात आली होती. मात्र, म्हसळा श्रीवर्धन मार्गाच्या रुंदीकरणाचे काम करताना भूमिगत वीज वाहिनी खराब झाली आहे. त्यामुळे श्रीवर्धनकरांना अंधाराचा सामना करावा लागला होता. आगामी काळात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव हे सण येणार आहेत. त्यामुळे यावेळी तरी वीज पुरवठा व्यवस्थित सुरू राहावा, विज पुरवठा खंडीत होऊ नये, याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. महावितरणचे कर्मचारी जर का कमी पडत असतील तर ठेकेदारी तत्त्वावर घेतलेल्या कामगारांकडून दुरुस्तीची कामे तातडीने करून घ्यावी अशी मागणी वीज ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

### विद्युत वाहिन्याचे मार्ग बदला

पाभरे येथून श्रीवर्धनकडे येणाऱ्या विद्युत वाहिन्या काही ठिकाणी खाडीमार्गातून आलेल्या आहेत. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी खाडीपात्रापासून रस्त्याच्यामार्गे जर का वीज वाहिन्या टाकल्या तर दुरुस्तीची कामे लवकरात लवकर करता येतील. श्रीवर्धन वासियांना सुरळीत वीज पुरवठा व्हावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# उरण तालुक्याला बाल्या नृत्याची परंपरा



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राला लोककलेची परंपरा लाभली असून, ही लोककला जपण्याचा प्रयत्न उरण तालुक्यात केला जात आहे. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या रांजणपाडा गावात १८ ऑगस्ट रोजी जय हनुमान नाच मंडळाच्या वतीने बाल्या नृत्याचे उद्घाटन करण्यात आले. भाद्रपद महिन्यात गौरी गणपतीच्या उत्सवासाठी तसेच नवरात्रीसाठी या मंडळाकडून तालुक्यात अनेक ठिकाणी बाल्या नृत्याचे कार्यक्रम होत असतात. गेल्या पंचवीस वर्षाची परंपरा या नाच मंडळाला असून या नाच मंडळाच्या स्थापनेच्या सुरुवातीचे गायक हे गव्हाणकोपरचे स्वर्गीय अमृत मोकल होते. उद्घाटन प्रसंगी रमेश पाटील, हसूराम पाटील, रमाकांत म्हात्रे, अनंत पाटील, रमेश म्हात्रे, राजेश ठाकूर, सुदर्शन पाटील, अलंकार कडू, प्रवीण नाईक, पांडुरंग पाटील, गुरुनाथ म्हात्रे, चंद्रकांत पाटील, विलास पाटील, अंकुश ठाकूर तसेच गावातील अन्य नागरिक उपस्थित होते.



# शिव प्रतिष्ठानतर्फे खाऊचे वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

शिव प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल तालुक्यातील नेरे येथील गिरीजा फाऊंडेशनतर्फे अनाथाश्रमामध्ये धान्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील, सुषमा मयेकर, प्रियांका ठाकूर, संदीप पाटील, राकेश कुसळे, अविनाश ठोसर, सुरेश बार्वे, अमर सावंत, राजेश शेलार, दीपक, ओंकार, शशांक, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सत्यजित पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व अनाथ आश्रमामध्ये प्रत्येक सामाजिक संस्थानी अन्न धान्य किंवा काही आर्थिक मदत देण्याचे उपक्रम राबविले पाहिजे तरच अनाथ मुलांना पुढील आयुष्यासाठी मदत होईल. यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन अनाथाश्रमामधील मुलांना सहकार्य करावे असे आवाहन केले. शिवप्रतिष्ठान करंजाडे या संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत शिवप्रतिष्ठान सामाजिक संस्थेने अनाथाश्रम मध्ये अन्न धान्य व खाऊ वाटप केल्याने आश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनीही या उपक्रमास प्रतिसाद देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# संतोष शिंगाडेंना महाराष्ट्ररत्न पुरस्कार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

समाजाच्या जडणघडणीत निस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या समाजसेवकांचा सन्मान होणे समाजकार्याला प्रेरणादायी ठरणे होय. आपटा-सारसई येथील समाजसेवक संतोष शिंगाडे यांना मिळालेला राजमाता अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्ररत्न पुरस्कार हा केवळ त्यांचा व्यक्तीगत गौरव नसून, समाजसेवेच्या क्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या प्रयत्नांना मिळालेली दखल आहे.



राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आयुष्यभर समाजातील वंचित, शोषित व दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी योगदान दिले. त्याच परंपरेत समाजकार्याची वाटचाल करताना संतोष शिंगाडे यांनी आदिवासी, वंचित व गरजू घटकांसाठी सातत्याने काम करून दाखवले आहे. त्यामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळणे हे अत्यंत योग्य ठरले आहे.

माजी आ. अशोक धात्रक यांच्या हस्ते झालेला हा गौरव सोहळा, समाजसेवकांना नवे ऊर्जास्थान देणारा ठरला. आजच्या भोगवादी व स्वार्थी प्रवृत्तीच्या काळात समाजहितासाठी कार्य करणे ही सोपी गोष्ट नाही. संतोष शिंगाडे यांनी विविध चळवळींतून सामान्य माणसांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. पुरस्कार बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होते आहे.

# अशोक ठाकूर यांना देवाज्ञा

**उरण :** आत्माराम ठाकूर मिशन संचलित व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल आवरेचे संस्थापक व अध्यक्ष एक शिक्षण प्रेमी विद्येचे उपासक अशोक ठाकूर यांचे १५ ऑगस्ट २०२५ रोजी निधन झाले. ठाकूर यांनी १५ ऑगस्ट रोजी आपल्या शाळेतील स्वतंत्रता रॅलीत त्यांनी सहभाग घेतला व नंतर देह त्यागला. ठाकूर यांचे दशविधी दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी उरण तालुक्यातील वशेणी खाडीत तर उत्तरकार्य हे राहत्या घरी आवरे येथे त्याच दिवशी होणार असल्यांचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे



# पोलीस मित्र संघटनेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या बेकहवाडी आणि आसलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. अखिल पोलीस मित्र संघटनेने विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन ही मदत देण्यात आली.

यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर सालोखे, रतन लोंगले, सुप्रेश सालोखे, प्रफुल जाधव, संतोष सकपाल, राजू सिन्हा, गोविंद सांबरी, विलास सांबरी, संतोष सांबरी, रमेश सांबरी, चंद्रकांत सांबरी, पांडू साबरी, शिवराम सांबरी, रुपेश निरगुडा आदी दुर्गम भागात ही मदत घेऊन पोहचले होते. स्थानिक आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी, गणेश पारधी हे देखील उपस्थित होते.

# मोहल्ल्यांतील रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

## • काम तात्काळ न केल्यास आंदोलनाचा इशारा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील निजामपूर मस्जिद मोहल्ला येथील खचलेल्या रस्त्याकडे ग्रामपंचायतीने पूर्णतः दुर्लक्ष केल्याची तक्रार येथील ग्रामस्थ लियाकत जालगावकर यांना केला आहे. या संदर्भात त्यांनी प्रसार माध्यमांना लेखी मांडली आहे. रस्त्याची समस्या ग्रामपंचायतीने तात्काळ न सोडविल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थ जालगावकर व सहकाऱ्यांनी दिला आहे. निजामपूर मोहल्लयातील खचलेला हा रस्ता रायगडकडे जात असून या रस्त्याची समस्या अत्यंत बिकट आहे.





रस्त्याच्या प्रश्नाबाबत जालगावकर यांनी ग्रामपंचायतीला जुलै २०२५ मध्ये सुरुवातीला लेखी तक्रार अर्जही दिला आहे. जालगावकर यांच्या घरासमोरील हा रस्ता खचला आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होत असून अनेकवेळा ही वाहने जालगावकर यांच्या संरक्षक भिंतीला घासतात त्यामुळे कंपाऊंड वॉलचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवाय या रस्त्यावरील तुटलेल्या जाळ्यांमुळे तेथील रहिवाशांना आणि वाहनाना ते त्रासदायक ठरत असून या मार्गावरून जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनाही या जाळ्यांमुळे दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रश्नाकडे भागातील कोणीच लोकप्रतिनिधी अथवा ग्रामपंचायत लक्ष देत नसल्याने जालगावकर यांनी तक्रार अर्जात म्हटले असून आमच्या मालमत्तेची तसेच काही अन्य घटना घडली तर याला निजामपूर ग्रामपंचायत जबाबदार असेल असे सांगत लवकरात लवकर हा प्रश्न ग्रामपंचायतीने मार्गी लावावा, अन्यथा ग्रामपंचायत ठिकाणी उग्र आंदोलन करण्याचा इशारा जालगावकर यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना दिला.

# विवाहिता बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील करंजाडे येथील बावीस वर्षीय विवाहित महिला बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मैत्रिणीकडे जाते, असे सांगून ती बाहेर गेली, ती अद्याप परत आली, नसल्याचे सांगण्यात आले आहे.

कोमल भुजंग राजपुरे असे या महिलेचे नाव आहे. तिची उंची-४.५ फूट असून अंगाने सडपातळ, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे वाढलेले, अंगात मेहंदी रंगाचा टी-शर्ट, काळ्या रंगाचा प्लाझो घातलेला असे वर्णन आहे.



या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक फौजदार हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## कोकण मराठी साहित्य परिषद शाखा

# माणगावची कार्यकारिणी जाहीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणातील साहित्य क्षेत्रातील महत्वाची समजली जात असलेल्या कोकण मराठी साहित्य परिषद माणगाव शाखेची आगामी तीन वर्षासाठी नवीन कार्यकारिणी विशेष सर्वसाधारण सभेत निवडण्यात आली.



नवीन कार्यकारिणी निवडीनुसार अध्यक्ष पदावर इतिहास अभ्यासक, लेखक रामजी कदम यांचे नाव सर्वानुमते निश्चित करण्यात आले. उपाध्यक्ष गझलकार संगीता नाचपल्ले, सचिव पदावर कवयित्री सायराबानू चौगुले तसेच खजिनदारपदी कवी संदेश शिंदे यांची निवड करण्यात आली. मागील चार वर्षांपासून विविध साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रम राबवून माणगाव शाखा सक्रिय ठेवणारे माजी अध्यक्ष अजित शेडगे यांना जिल्हा प्रतिनिधी तसेच युवा साहित्यिक निखील सुतार यांची युवाशक्तीप्रमुख म्हणून निवड करण्यात आली. कोकण मराठी साहित्य परिषद माणगाव शाखेच्या सर्वच उपक्रमात हिरीरीने सहभागी होणारे सहसचिव दिगंबर आडीत , कार्यकारिणी सदस्य म्हणून रूपेश शेठ, संतोष गायकवाड, आणि ज्येष्ठ साहित्यिक ज्योती बुटाला यांची निवड सर्वानुमते निश्चित करण्यात आली.

नवीन कार्यकारिणी निवडीबद्दल कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ यांनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच आगामी तीन वर्षाच्या कार्यकाळात माणगाव शाखेच्या माध्यमातून दिपावली पहाट, मराठी राजभाषा गौरव दिनश् महाकवी कालिदास जयंती यांसारख्या उपक्रमांसोबतच नवोदित साहित्यिकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मनोगत नवनिर्वाचित अध्यक्ष रामजी कदम यांनी व्यक्त केले.

## भाज्यांचे महत्व समजण्यासाठी प्रदर्शन | आरोग्य सुदृढ ठेवण्याचे आवाहन

# चाफेवाडीत रानभाज्या महोत्सव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील चाफेवाडी येथे असलेल्या शासकीय आदिवासी आश्रमशाळेत रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांना जंगलातील रानभाज्या यांचे महत्व समजावे यासाठी हा महोत्सव भरवण्यात आला होता.**

चाफेवाडी येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेमध्ये रायगड कीस्टोन फांऊडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रानभाज्या आणि माशांचे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनात आपल्या दैनंदिन आहारातील रानभाज्यांचे महत्व सांगणारे प्रदर्शन भरवले होते. त्याचवेळी जंगल परिसरात मिळणाऱ्या माशांचे प्रत्यक्ष प्रदर्शन व त्यांचे महत्त्व विशद करणारे चर्चासत्र आयोजित केले होते. यावेळी अधिक्षक ओमकार चव्हाण यांनी रानभाज्या आपल्या ठराविक काळात जंगलात उपलब्ध होत असतात. त्या भाज्या आपल्या आहाराच्या दृष्टीने महत्वाच्या असतात आणि त्यामुळे त्या भाज्या त्या त्या हंगामात आपण खाव्या आणि आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यास फायदा करून घ्यावा असे आवाहन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना केले.



शासकीय आश्रमशाळेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या रानभाज्या महोत्सवात माठ, शेवळा, अळू, तेरा, टाकळा, कुर्डू, शेवगा, लोथ, खरशिंग, डीना, डिन्याची फुले, कुड्याची शेंग, गिदवड वेल, भवरी वेल, कैला, रानतीळ आदी रानभाज्या मांडण्यात आल्या होत्या. तर विविध प्रकारचे मासे प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी ठेवण्यात आले होते. त्यात भुरबूट, वरडोळ्या, तेलापा, मळ्याचा मासा, खुबी, खेकडा यांचा समावेश होता.

यावेळी एम. पी. पाटील, क्रिस्टन फाऊंडेशनचे सोनवणे तसेच शाळेचे अधीक्षक चव्हाण, अधीक्षिका शिरसागर तसेच जिजाबाई पादीर, सविता पादीर, जगन पादीर आणि उमेश सोनीने आदी उपस्थित होते.

### रानभाज्यांचे महत्त्व

रानात, माळरानावर, शेताच्या बांधावर किंवा जंगलाच्या कडेला निसर्गतः उगवणाऱ्या भाज्यांना रानभाज्या म्हणतात. शेती, सिंचन किंवा निगा न करता निसर्ग स्वतःच ज्या वनस्पती पिकवतो त्या रानभाज्या पोषणदृष्ट्या अतिशय समृद्ध असतात. या भाज्यांमध्ये खनिजे, आवश्यक मूलद्रव्ये आणि औषधी गुणधर्म भरपूर प्रमाणात आढळत असल्यामुळे शरीरासाठी हितकारक ठरतात.

# डॉ. श्याम ढवण राष्ट्रपती पारितोषकाने सन्मानित

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सासवणे गावचे सुपुत्र डॉ. श्याम भालचंद्र ढवण यांना १५ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रपती पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सासवणे गावचे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील, स्वातंत्र्य सैनिक भालचंद्र ढवण यांचे पुत्र डॉ. ढवण आहेत. त्याचे प्राथमिक, उच्च शिक्षण मुंबईत झाले. नंतर व्हीएससी ही पशुवैद्यकीय पदवी १९८२ मध्ये घेतल्यानंतर १९८३ मध्ये त्यांच्या मायभूमी अलिबाग पंचायत समिती येथे पशुधन विकास अधिकारी विस्तार या पदावर श्रेणी-१ अधिकारी म्हणून शासकीय सेवेत दाखल झाले. आपल्या तालुक्यातील पशुपालक शेतकऱ्यांना आपल्या पशुवैद्यकीय ज्ञानाचा लाभ व्हावा यादृष्टीने त्यांनी शासनाच्या अनेक विकासात्मक योजना राबवण्याचा संकल्प केला. त्यांनी तालुक्यातील गोरगरीब पशुपालकांचे अनेक शासकीय योजना द्वारे आर्थिक स्तर उंचवण्याचे कार्य केले. त्याच्या या कार्याची दखल घेत डॉ. ढवण यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले. रायगड तालुका अलिबाग याचे नाव उज्वल केल्यामुळे त्यांच्यावर अनेक स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# उरणमध्ये ग्राहकांच्या जीवाशी खेळ?

## मुदत नमुद न करता केली जाते मिठाईची विक्री, अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष

**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण तालुक्यातील मिठाई विक्रीच्या बहुतांश दुकानांतून 'बेस्ट बिफोर' व 'एक्सपायरी डेट' नमूद न करता सर्रासपणे मिठाई विक्री केली जात असल्याचे समोर आले आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारी ही गंभीर बाब असून याकडे औषध प्रशासनाचे व संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात आहे.**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पेढे, लाडू, श्रीखंड, आम्रखंड, काजू कतली, रस मलई, गुलाबजाम यासारख्या मिठाई आकर्षक पॅकिंगमध्ये विक्रीस आहेत, परंतु या पॅकिंगवर मिठाई कधी तयार झाली व किती दिवसांत खावी याचा उल्लेख नाही. त्यामुळे कालबाह्य पदार्थ खाऊन विषबाधा होण्याचा धोका वाढला आहे. दुकानदारांकडून ग्राहकांना बील देणे टाळले जाते, त्यामुळे नंतर कारवाईसाठी पुरावेही मिळत नाहीत. औषध प्रशासनाचे काही अधिकारी कारवाई करण्याचे टाळतात अशी चर्चा आहे.



उरण शहर, द्रोणागिरी नोड व तालुक्यातील गावोगावी बनावट मावा ही मोठ्या प्रमाणात येत असून तो छुप्या पध्दतीने पहाटेच्यावेळीच विक्रेत्यांना दिला जात असल्याचे समजते. काही मिठाई विक्रेत्यांच्या मिठाईमध्ये जिवंत किडे सापडण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र त्यांच्यावर अन्न व औषध प्रशासनाकडून ठोस कारवाई झाली नाही. यावरून अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी यांचे मिठाई विक्रेते ग्राहकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात आहे. जर शासन व प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही सामाजिक संघटना रस्त्यावर उतरण्यात येईल असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, असी मागणी होत आहे.

### गुन्हे दाखल करण्याची मागणी

**शहरातील सर्व मिठाई विक्री दुकाने तात्काळ तपासणी अंतर्गत आणावीत, ज्या दुकानदारांकडून नियमांचे उल्लंघन होत आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, ग्राहकांना मिठाई खरेदी करताना पक्के बील देणे बंधनकारक करावे, औषध प्रशासनाच्या कामगिरीवर जिल्हा पातळीवर तपास समिती नियुक्त करावी अशी मागणी सामाजिक संघटनाकडून जोर धरू लागली आहे.**

# पालीतील रस्त्यांवर खड्ड्यांचा विळखा

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाली शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी शिवसेना (उबाठा) तर्फे विद्वेश आचार्य यांनी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

२९ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत पाली व खेडोपाड्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. श्री बल्लाळेश्वर मंदिरातही देशभरातून भाविक मोठ्या संख्येने येणार असल्याने



शहरातील रस्त्यांची दुरवस्था चिंतेचा विषय ठरत आहे. पोलीस स्टेशन ते गणपती मंदिर, हटाळेश्वर चौक, विक्रम स्टँड तसेच पालीतील प्रमुख रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, या खड्ड्यांमुळे गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असून पावसामुळे खड्डे खोल होऊन गंभीर अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे.

वाहनांचे नुकसान तर होतच आहे, मात्र पादचाऱ्यांच्या जीवितासही धोका संभवतो. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. अन्यथा शिवसेना आंदोलन छेडेल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# उरणमध्ये भातशेती धोक्यात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील पूर्व विभागाला सतत तीन दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचा तडाखा बसला असून, या भागातील कौलारू घरे कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

भात शेतीलाही मोठ्या प्रमाणात तडाखा बसला आहे. डोंगर माथ्यावरून वाहणाऱ्या नैसर्गिक झऱ्यातून येणारा गाळ मोठ्या प्रमाणात भातशेतीत बसला असून, काही शेताचे बांध (खांडी) वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेती चांगली बहरली होती. परंतु वाहून येणाऱ्या गाळाने भात शेती भरल्यामुळे भात शेती धोक्यात आली आहे. याशिवाय किडीचाही प्रादुर्भाव टळणार असल्याचे शेतकरी सांगत असले तरी बऱ्याच ठिकाणी शेतात बसलेल्या गाळामुळे व बांधांना पडलेल्या खांडींमुळे भात शेतीचे नुकसान झाल्याची चर्चा या परिसरात ऐकावयास मिळत आहे.

दरम्यान, संबंधित शासनाने भातशेतीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती भरपाई द्यावी अशी मागणी येथील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# मराठा संघर्षासाठी ऐतिहासिक हाक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण करणार आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी यांच्यावतीने मराठा भवन कार्यालय, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे बैठक पार पडली.

या बैठकीत समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकमुखी निर्णय घेतला की, मुंबईत होणाऱ्या या आंदोलनात सकल मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच महाराष्ट्रभरातून येणाऱ्या आपल्या




बांधवांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेत त्यांच्या अन्न, पाणी व निवासाची सोय करून समाजसेवेचे कार्य पार पाडत मराठा समाजाची ताकद दाखवायची. यावेळी मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते. तसेच त्यांनी आझाद मैदान येथे उपस्थित राहणार असल्याचे सांगितले

# वेदक कॉलेजच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**। तळा । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठाचा ५८ वा दक्षिण रायगड विभागाचा युवा महोत्सव २०२५ अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज ऑफ सायन्स जंजिरा, मुरुड येथे संपन्न झाला. या युवा महोत्सवात दर वर्षी प्रमाणे रायगड जिल्ह्यातील २४ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपल्या विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. तळा तालुक्यातील जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या युवा महोत्सवात आपला सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील क्षितिजा करण हिने रांगोळी या कला प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले तर फातिमा फटाकरे हिने मेहंदी



डिझायनिंग या कलाप्रकारात तृतीय क्रमांक पटकावला. मराठी पथनाट्य या कलाप्रकारात महाविद्यालयातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत मीच तो नावाचं पथनाट्य सादर केले. या पथनाट्याला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या पथनाट्यात अथर्व गोडवले, मयुर जंगम, सौरभ मालुसकर, साई शिंदे, आर्यन मोरे आणि सूरज जाधव यांनी आपल्या अभिनयाचे उत्तम प्रदर्शन केले. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. अमोल निकम, डॉ. पी. बी. अभंगे, रिया राजपुरकर, डॉ. विवेक राणे, संदीप राठोड, पल्लवी भट या संस्कृतिक विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अमोल निकम यांनी या यशाबद्दल सर्व सहभागी आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करणाऱ्या महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. शाहीना मिर्झा तसेच महाविद्यालय व्यवस्थापन यांचे आभार व्यक्त केले.

# विघ्नहर्ता पुरस्काराचे वितरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव सन २०२४ मधील उत्कृष्ट गणेश मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम क्रमांक श्री गणेश उत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक, उरण तर द्वितीय क्रमांक श्री गणेश मित्र मंडळ, सेक्टर ३४, कामोठे यांनी पटकावला. उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम गटात प्रथम क्रमांक शंभो मित्रमंडळ, सेक्टर ३५, कामोठे, व्दितीय क्रमांक गणेश मित्र मंडळ, सेक्टर १८,




खारघर, शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूक गटात प्रथम क्रमांक जय दुर्गा क्रीडा व ग्रामविकास तरुण मंडळ, रोहिंजण, तळोजा तर द्वितीय क्रमांक अभिनव युवक मित्र मंडळ, पायोनियर विभाग, पनवेल यांनी पटकावला.

उत्कृष्ट देखावा या गटात प्रथम क्रमांक राजे शिवाजीनगर रहिवाशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळंबोली. द्वितीय क्रमांक एकविरा मित्र मंडळ, तक्का, पनवेल, सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ गटात प्रथम क्रमांक जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रिटघर, तर द्वितीय क्रमांक अनमोल जीवन वेलफेअर असोसिएशन, उलवे यांनी पटकावला त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

## पनवेलमध्ये १३५ नागरिकांचे स्थलांतर

**पनवेल :** सततच्या मुसळधार पावसामुळे नवीन पनवेल येथे बांठिया विद्यालयासमोरील रस्ता, करंजाडे वसाहतीमधील पुनर्वसितांच्या आर. १ व २ तसेच पनवेल येथील पटेलमोहल्ला व कच्छी मोहल्ला येथील १३५ जणांना पालिकेच्या शाळांमध्ये सुखरुप स्थलांतरित करण्यात आले आहे. कळंबोली वसाहतींच्या काही सखल भागात सततच्या पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले होते. नागरिकांच्या निवाऱ्याची सोय करण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला दिले आहेत.

# सुधागडातील शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे सुधागड तालुका रहिवाशी सेवा संघ ठाणे व टाटा कॅपिटल लिमिटेड आयोजित विविध शैक्षणिक व क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले.

समारंभाचे औचित्य साधून सुरेश खैरे यांची कोकण विभागातून पश्चिम महाराष्ट्र सहकारी बोर्डाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी शैक्षणिक व क्रीडा साहित्य शाळेच्या प्रतिनिधीकडे सुपूर्द करण्यांत आले.

कार्यक्रमास संस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल खेरटकर, सल्लागार सुरेश शिंदे, अनिल सागळे, प्रकाश शिलकर, अविकांत साळुंके, राकेश थोरवे प्रमुख, विजय जाधव, राजेश बामणे, भगवान तेलंगे, सुजित बारस्कर, जीवन साजेकर, १४ माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, प्रतिनिधी, तालुक्यातील व नांदगाव पंचक्रोशीतील प्रतिष्ठित कार्यकर्ते, शाळेचे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन | सर्पमित्रांकडून जनजागृती सुरू

# सततच्या पावसामुळे साप रस्त्यावर

**। उरण । प्रतिनिधी ।**

**मागील चार दिवसांपासून उरण तालुक्यात पाऊस वाढला असून, या दिवसांत घराजवळ, रस्त्यावर विविध जातीचे साप आढळून येत आहेत. सततच्या पावसामुळे जमिनीतील बिळांमध्ये पाणी गेल्याने अन्नाच्या शोधात साप बाहेर पडत आहेत. तरी नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी काळजी घेण्यासाठी सतर्क राहावे असे आवाहन सर्प मित्रांकडून करण्यात येत आहे.**

पावसाळा सुरू होण्याच्या काळात बऱ्याच जातींच्या सापांचा प्रजननकाळ असतो. बिळामध्ये पाणी साचत असल्याने ते लपण्यासाठी सुरक्षित जागेच्या शोधात



असतात. जून-ऑगस्ट या कालावधीत साप मानवी वस्तीच्या आसपास आढळून येतात. म्हणून या काळात नागरिकांनी साप दिसला, तर घाबरून न जाता आपत्कालीन परिस्थितीची शास्त्रीय माहिती घ्यावी, अशी जनजागृती विविध निसर्ग सर्प आणि प्राणीप्रेमी संघटनांतर्फे समाज माध्यमांतून करत आहेत; तसेच शाळा, महाविद्यालयांतही जनजागृती सुरू केली जात आहे. उरण हा डोंगर टेकऱ्यावर तसेच समुद्र किनाऱ्याजवळ वसलेला तालुका आहे.

नाग, मण्यार, घोणस, फुरसे हे तालुक्यातील मानवी वस्तीजवळ आढळणारे प्रमुख चार विषारी साप आहेत. सध्या पावसाची संततधार सुरू असल्याने बिळात पाणी साचत असल्याने ते लपण्यासाठी व अन्नाच्या शोधार्थ मानवी वस्तीत व रस्त्यावर दिसून येत आहेत. त्यामुळे अशा सापांपासून सावध राहावे. पावसाळ्यात सर्पदंशाचे प्रकार वाढतात. खबरदारीच्या उपाययोजना करून स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक असून साप आढळल्यास तात्काळ आप आपल्या परिसरातील सर्प मित्रांना माहिती देण्यात यावी असे आवाहन सर्प मित्रांकडून करण्यात येत आहे.

### सापांविषयी भिती

आपल्या पूर्वजांच्या काळात दवाखाने, हॉस्पिटल, डॉक्टर उपलब्ध नव्हते. जंगले मोठी व घनदाट होती. लोकवस्ती लहान व घरे साधी होती. रस्ते व पायवाटा तितक्याशा उपलब्ध नव्हत्या. यामुळे वन्यजीवांची प्रामुख्याने सापांच्या हालचाली जास्त होत होत्या. अशामुळे एखाद्या व्यक्तीला विषारी सर्पदंश झाला असावा. औषधोपचार उपलब्ध नसल्याने काही वेळात ती व्यक्ती मृत्यूमुखी पडली असावी. या घटनेमुळे तिथल्या लोकांमध्ये सापांविषयी भिती निर्माण झाली असावी.

## निवडक




### संगोपनाबाबत पालकांना मार्गदर्शन

**पेण :** पेण येथील सोबती संघटनेचे संस्थापक माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने यांच्या मार्गदर्शनाखाली सोबती संघटना लहान विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी एका अनोख्या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये सप्तसूत्री कार्यक्रमाचा वापर करुन लहान विद्यार्थ्यांच्या मनावर सुयोग्य परिणाम होतील याचा विचार करुन पालक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये १. मुलांचा नैसर्गिक विकास २. सकारात्मक पालकत्व ३. मोबाईल टीव्ही आणि स्क्रीन टाईम ४. राग, हट्ट आणि टॅन्ट्रम्स हाताळणे ५. रोजची सवय लावणे ६. भावनिक समज आणि आत्मविश्वास ७. शाळेची तयारी आणि प्राथमिक शिक्षण या सप्तसूत्रीचा वापर करुन लहान विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम केल्यास त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल होऊ शकतात, अशा प्रकारचे मार्गदर्शन डॉ. तुषार पाटील मानसोपचार तज्ज्ञ यांनी केले व काही त्यासाठी प्रात्यक्षिकदेखील दाखवण्यात आली. या कार्यक्रमासाठी संस्थापक सोबती संघटना ॲड. बापूसाहेब नेने, अध्यक्ष सोबती संघटना व अध्यक्ष पेण एज्युकेशन सोसायटी ॲड. मंगेश नेने, सेक्रेटरी सोबती संघटना डॉ. ॲड. नीता कदम, सदस्य सोबती संघटना प्रितेश दोशी, उपाध्यक्ष पेण एज्युकेशन सोसायटी संजय कडू, प्रशासकीय अधिकारी पेण एज्युकेशन सोसायटी दिगंबर चिंचणीकर, पेण एज्युकेशन सोसायटीच्या मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, पेण एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूल या मुख्याध्यापिका रोहिणी म्हात्रे तसेच भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता पहिलीचे पालक उपस्थित होते.



### जयघोषांनी शिवनेरी दुमदुमली

**पनवेल :** छत्रपतींचा आदर्श, विचार समोर ठेवून करंजाडेतील जनसामान्यात रुजावे आणि आदर्श समाज निर्माण व्हावा यासाठी गडकिल्ले संवर्धन आणि दर्शन नियोजन करण्यात येते. या मोहिमेत युनेस्कोने घोषित केलेल्या (जागतिक वारसा स्थळ)वरील दुर्गराज रायगड वारी, किल्ले लोहगड दर्शन व १३५ शिवभक्तांच्या सहभागातून शिवनेरी दर्शन मोहीम पार पडली. बुद्धी, संघर्ष, शौर्य आणि पराक्रमातून सामर्थ्यशाली भारत राष्ट्र उभ राहिलेय ते हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि स्वराज्या साठी बलिदान दिलेल्या मावळ्यांचा कर्तृत्वावर. हिंदुस्थानच्या क्षितिजावर आजही एकच नाव कोरलेले आहे ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. स्पर्धात्मक युगात लढण्याचे बळ म्हणजे शिवविचार आणि आदर्श. करंजाडे, पनवेलमधील रहिवाशांनी किल्ले शिवनेरीवर इतिहासिक वास्तू पहिल्या व अनुभव घेतला. शिवाई देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. किल्ले शिवनेरी दर्शनमध्ये तीन बस व चारचाकी वाहनांचा समावेश होतो. नाश्ता, जेवण, फळ, बिस्कीट, चॉकलेट व पाण्याची उत्तम सोय करण्यात आली. तसेच भगवान शिवभक्त म्हणून चार शिवभक्तांना विठ्ठल रुक्मिणी व भक्ती शक्ती मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महाराजांच्या इतिहासाबद्दल प्रश्न विचारून विजयी शिवभक्तांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती शिवाजीचा इतिहास व्याख्यानातून सांगून वैदेही मोरे यांनी सर्वांची मने जिंकली.



### ज्येष्ठ नागरिक मंडळाचा गौरव

**उरण :** लोकहितासाठी यशस्वी व प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा व परिसर यांना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी सन्मानित करून सन्मानपत्र दिले. सन २०२४-२५ या कालावधीत सामाजिक, आरोग्यविषयक कार्य महिला-पुरुष मैत्री मेळावे, प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा सन्मान, स्वच्छता अभियान, ज्येष्ठ नागरिक वाढदिवस साजरे करणे या उपक्रमामुळे समाजहिताची अमूल्य सेवा केली आहे. समाजसेवेची प्रेरणा इतरांना मिळावी याची दखल घेऊन तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. यावेळी नरेश पेढवी, महेश पाटील, रवींद्र सानप, प्रभाकर नवाळे, नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, परशुराम पाटील, सुभाष गुरव, ईश्वर म्हात्रे आदी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोलेरो पिकवर ड्रायव्हर पाहिजे. ९४२२१५१४५१
- शिवानी पेट शॉप अलिबाग/चोंढी/पेण/तळोजा येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६.
- अलिबाग शहराच्या मध्यभागी २ बीएचके टेरेस फ्लॅट. एस.टी. स्टँड, कॅटामरन बस स्टॉप पासुन चालत ५ मिनटाचे अंतरावर सुसज्ज, २ एसी सह. इन्व्हर्टर फिटींग, ईलेक्ट्रिक गीझर, किचन ट्रॉली व बऱ्याच सुविधा. त्वरा करा, अत्यंत मोक्याचे ठिकाण व सोयीसुविधांनी सुसज्ज. संपर्क. ७८७५५६०८१/ ९४२३३७७६०८/७७४१००२३०८
- अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मोबाईल नं. ९१४६६२४५१०. वेळ सकाळी १० ते ६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ट्रक कलंडल्याने वाहतूक कोंडी

। रसायनी । प्रतिनिधी ।

कर्जत-चौक रस्त्यावर पाण्याच्या बाटल्या भरलेला ट्रक रस्त्यात आडवा झाल्याने काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी लागलीच धाव घेऊन मदत केली. त्यामुळे काही वेळातच वाहतूक सुरळीत झाली.

मंगळवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास एमएच १५/एच एच/९१९६ हा ट्रक पाण्याच्या बाटल्या भरलेले बॉक्स घेऊन कर्जत वरून मुंबई दिशेला जात असताना खालापूर तालुका हद्दीतील वावर्ले खैराटजवळ उतरणीवर आला असता चालकाने अचानक ब्रेक मारला. रस्त्याला उतरण आणि वळण असल्याने गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यातच गाडीत पिण्याच्या पाण्याने भरलेल्या बाटल्या बॉक्समध्ये होत्या. त्यामुळे गाडीवरील नियंत्रण सुटले, आणि ट्रक आडवा झाला, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यातच धो-धो पाऊस सुरू आहे. रस्त्यात ट्रक आडवा झाल्याने चौक-कर्जत आणि कर्जत-चौक अशा दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

---

दिनांक २०/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे नाडसुर ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे वाक्लोळी ता.सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स. नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| सारिका शांताराम गायकवाड व २० | ५३ | १-२०-४० | २१-१६ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक २०/०८/२०२५

सही /-
**श्री.प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे दहीवली तर्फे निड ता : कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे. दहीवली तर्फे निड ता : कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री.हेमंत दत्तात्रेय डोंबे | १०१ | ०-५३-७०<br>अधिक पो.ख ०-०३-५०<br>असे एकुण क्षेत्र<br>०-५७-२० हे.आर.पॉ | ७.५५ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, खरेदीखत, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७(सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२१/०८/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.महेश कमलाकर थोरवे**
रा.कर्जत ता.कर्जत जि.रायगड
मो. नं. ८००७५३७६५६

---

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील गोरेगाव रोड स्थानकावरील क्र. 1 प्रवासी फलक (प्लॅटफॉर्म) रेल्वे पातळीवरून उच्च पातळीवर रूपांतरित करण्याचे काम. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-पीएफजीएनओ-2025-26 दिनांक: 21/08/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹1,68,53,062.35/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 28/08/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 11/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सून वगळता 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

---

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या यांच्या प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वर्ष २०२५-२६च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांना ई-निविदा क्रमांक टी-१५, टी-१६/०८-२०२५ एकूण २ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.२१.०८.२०२५ ते ०४.०९.२०२५ (दुपारी ०२.०० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. ०४.०९.२०२५ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO-225** **कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**

---

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, आम्ही, आमच्या अशिलांच्या वतीने यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या आणि गाव कलवाडखर, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथील सर्व (एक) एकनाथ बाळाराम म्हात्रे यांचे गट क्रमांक १५ मध्ये समाविष्ट असलेल्या, क्षेत्रफळ ६८८० चौरस मीटर जमिनीच्या संबंधातील (दोन) (१) प्रकाश शंकर पाटील, (२) सुवर्णा लक्ष्मण हुदर, (३) शालिनी शिवाजी पाटील, (४) अजित शिवाजी पाटील, (५) शुभांगी शिवाजी पाटील आणि (६) निलिमा शिवाजी पाटील यांचे गट क्रमांक १९१ मध्ये समाविष्ट असलेल्या, क्षेत्रफळ ५४६० चौरस मीटर जमिनीच्या संबंधातील (तीन) जनार्दन आल्या पाटील यांचे गट क्रमांक २००, क्षेत्रफळ ४२२० चौरस मीटर जमिनीच्या संबंधातील (चार) (१) प्रकाश शंकर पाटील, (२) सुवर्णा लक्ष्मण हुदर, (३) शालिनी शिवाजी पाटील, (४) अजित शिवाजी पाटील, (५) शुभांगी शिवाजी पाटील आणि (६) निलिमा शिवाजी पाटील यांचे गट क्रमांक २३०, क्षेत्रफळ ३०१० चौरस मीटर जमिनीच्या (कलवाडखर जमीन) संबंधातील आणि (पाच) कौसल्या दत्तात्रेय पाटील यांचे यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या आणि गाव श्रीगाव, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथील गट क्रमांक ४१/२ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रफळ ३५३० चौरस मीटर जमिनीच्या अशा दोन्हींचा समावेश असलेल्या त्या सर्व तुकड्यावरील आणि भागावरील (यात यानंतर एकत्रितपणे मालमत्ता असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) मालकी अधिकार, हक्क आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत. कलवडखार जमीन आणि श्रीगाव जमीन यांचा यात यानंतर एकत्रितपणे मालमत्ता असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

कोणत्याही व्यक्ती/ संस्था यांना सदर मालमत्तेतील किंवा त्यातील कोणत्याही भागातील कोणत्याही स्वरूपाची विक्री, सामंजस्य ज्ञापन, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, आकार, भार, भाडेदारी, पोट-भाडेदारी, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, गहाण, (समन्याय किंवा अन्यथा), वारसा, भोगवटा, कब्जा, विभाजन, शेअर, बक्षीस, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, निर्गम, विकास अधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, प्रसंविदा किंवा अट, सुविधाधिकार, अधित्याग, अधित्यजन, किंवा कोणत्याही पद्धतीने कोणताही करारनामा, करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, विवाद, कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण, महसूल किंवा संविधिमान्य प्राधिकरण किंवा लवाद यांनी संमत केलेला हुकूमनामा किंवा आदेश किंवा निवाडा याद्वारे किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही हिस्सा, अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप, आणि/ किंवा मागणी (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ) असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०००१३ येथे आणि तसेच monika.bhonsale@trilegal.com and sohni.kherada@trilegal.com, या इ-मेल वर या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्यातील दस्तावेजी पुराव्याच्या पूर्ण आणि प्रमाणित केलेल्या सत्य प्रतींसह लेखी स्वरूपामध्ये सूचित करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा कोणताही दावा/कोणतेही दावे, जर काही असतील तर, त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे कलवाडखर आणि **श्रीगाव, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथील जमिनीचे ते सर्व तुकडे किंवा भाग :**

| सर्व्हे क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये) | सिमा |
|---|---|---|
| **मौजे कलवाडखर** | | |
| १५ | ६८८० | उत्तर दिशेकडे : गट क्रमांक १२<br>दक्षिण दिशेकडे: गट क्रमांक १६, २६२ आणि २५८<br>पूर्व दिशेकडे : गट क्रमांक १८ आणि<br>पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २ |
| १९१ | ५४६० | उत्तर दिशेकडे : गट क्रमांक १८७ आणि १८८;<br>दक्षिण दिशेकड: गट क्रमांक १९२<br>पूर्व दिशेकडे : गट क्रमांक १९०<br>पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २५४ |
| २०० | ४२२० | उत्तर दिशेकडे : गट क्रमांक १९३<br>दक्षिण दिशेकडे : गट क्रमांक २०१<br>पूर्व दिशेकडे : गट क्रमांक १९९ आणि गट क्रमांक २०२<br>पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २०३ आणि २१० |
| २३० | ३०१० | उत्तर दिशेकडे : गट क्रमांक २५३ आणि गट क्रमांक २५४<br>दक्षिण दिशेकडे: गट क्रमांक २२८<br>पूर्व दिशेकडे : गट क्रमांक २२९<br>पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २३१ |
| **मौजे श्रीगाव** | | |
| ४१/२ | ३५३० | उत्तर दिशेकडे : गट क्रमांक २७<br>दक्षिण दिशेकडे: गट क्रमांक ४०, गट क्रमांक ४२ आणि गट क्रमांक ४६,<br>पूर्व दिशेकडे : गट क्रमांक २१ आणि गट क्रमांक २२<br>पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक ४१/१ |

**आज दिनांक २१ ऑगस्ट, २०२५**

**मोनिका भोसले**
**भागिदार**
**ट्रायलिगल**
वकील आणि सॉलीसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग,
लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०००१३

---

महाराष्ट्र राज्य परिवहन (प्रवाशांच्या सेवेसाठी, एस.टी.)

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभाग, पेण.**

**निविदा सुचना क्रमांक ०५ सन २०२५-२६**
**(तृतीय मागणी)**

विभाग नियंत्रक ,रा.प.रायगड विभाग, हे रा.प.रायगड विभागातील महाड या बसस्थानकावरील प्रसाधनगृहाची स्वच्छता करून चालविण्यास देण्यासाठी "पैसे भरा,वापरा,व हस्तांतरीत करा "या तत्त्वावर अनुभवी नोंदणीकृत सार्वजनिक संस्थाकडून (तृतीय मागणी) निविदा मागवित आहेत. सार्वजनिक संस्था ही सरकारमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

१)सार्वजनिक संस्था ही सरकारमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२)नोंदणीकृत दाखला वैध असला पाहिजे.
३)संस्थेस मागील दहा वर्षाचा सार्वजनिक शौचालय समाधानकारक चालविण्याचा अनुभवाचा दाखला आवश्यक आहे.
४)आयकर विवरण पत्र/सेल टॅक्स विवरण पत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
५)रुपये पन्नास हजार किंमतीची राष्ट्रीयकृत बँकेची सॉलव्हन्सी प्रमाणपत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
६)प्रसाधनगृहाच्या दैनंदिन देखभाल व स्वच्छतेसाठी लागणारे मनुष्यबळ असल्याचे दाखला/प्रमाणपत्र.
७) संस्थेकडे कुठल्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण नसल्याचे हमीपत्र.

सॅनेटरी मार्टकडून प्रशिक्षण घेतलेली संस्थाना तसेच मेहत्तर/वाल्मीकी समाजाच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य दिले जाईल.

कोरे निवीदा संच मिळण्याचा कालावधी :- दि.21.08.2025 ते 26.08.2025 पर्यंत (सार्वजनिक/स्थानिक/रविवार सुट्टी सोडून) सोमवार ते शुक्रवार दुपारी 14:00 वा.पर्यंत व शनिवारी 11:00 वा. पर्यंत.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :- दि.26.08.2025 रोजी दुपारी 15.00 वा. पर्यंत.

निविदा उघडण्याची तारीख :- दि. 26.08.2025 रोजी दुपारी 15.30 वा. शक्य झाल्यास.

कराराचा कालावधी :- कामाचा कार्यादेश दिल्यापासून ते निविदेच्या देकारातील कालावधीप्रमाणे.

कोऱ्या निविदा /कोटेशन संचाची किंमत जी.एस.टी.सह प्रति संचास (परत न मिळणारी) :-

1) रु. 500/- प्रति संच [नापरतावा]
[रु. 500/- निविदा संचाची किंमत + रु. 90/- विक्रीकर]

विभाग नियंत्रक,
रा. प. रायगड विभाग,पेण.

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोप्रोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक महेश रामचंद्र म्हात्रे, गणेश रामचंद्र म्हात्रे, अवंतिका अविनाश चौलकर, प्रफुल्ल रामचंद्र वार्डे, दिपा दत्तात्रेय म्हात्रे, श्वेता श्रीकांत पाटील, ज्योती राजेंद्र राणे, सुचित्रा सुभाष राऊत, नारायण रघुनाथ वार्डे, प्रदिप जगन्नाथ वार्डे, नम्रता नरेश राणे, मंजिरी मिलिंद राणे, सुषमा रजनिश रावते यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोप्रोली | २६ | ०-१२-१०<br>पो.ख.०-००-५०<br>०-१२-६० | ३.२५ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २१/८/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.सुनिल मनहर खडावाला, रा. १११, अजय अपार्टमेंट, १६ हंसराजलेन, भायखळा, मुंबई यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितले वरुन सर्व लोकांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नडोदे, ता.खालापूर, जि.रायगड, येथील जमिन मिळकत जिचे ७/१२ च्या उताऱ्यावरुन वर्णन खालीलप्रमाणे.**

| गाव | सर्व्हे नं./गट नं. हिस्सा नं. | जमिन मालकाचे नाव | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|
| नडोदे | ३/१२ | श्री.संतोष नारायण दुदुस्कर | ३-०५-१०<br>पैकी १-००-०० | १.४४ |

वरील नमुद मिळकतीपैकी १-००-०० हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकती ही मिळकतीचे मालक श्री.संतोष नारायण दुदुस्कर यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याबाबत दि.१६/०३/२०१७ रोजीचा करारनामा/वचनचिठ्ठी आमचे अशिलांचे लाभामध्ये लिहून दिलेला आहे. तसेच करारा अन्वये मिळकतीच्या ठरलेल्या मोबदल्याच्या रक्कमे पैकी बरीचशी रक्कम ही कराराचे वेळी व त्यानंतर वेळोवेळी कराराचा भाग म्हणून वेळोवेळी आमचे अशिलांकडून स्विकारलेली आहे. त्यामुळे करारा अन्वये आमचे अशिलांना पुरा करावयाचा भाग आमचे अशिलांनी पुरा केलेला आहे व करण्यास तयार आहेत. म्हणून सदरच्या मिळकतीमध्ये आमचे अशिलांना करारा अन्वये हक्क, हितसंबंध व अधिकार प्राप्त झालेला आहे.

त्यामुळे या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येत आहे की, कोणीही इच्छूक खरेदीदारांनी सदरच्या मिळकतीमधील आमचे अशिलांनी मिळकतींचे मालकांसोबत केलेल्या व्यवहारातील क्षेत्राबाबत सदर जमीन मालकांसोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये त्यास आमचे अशिलांची हरकत आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणत्याही इच्छूक खरेदीदाराने श्री. संतोष नारायण दुदुस्कर यांचे सोबत व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर होईल व तसा व्यवहार करणाऱ्या व्यक्ती ह्या प्रामाणिक खरेदीदार होणार नाहीत. त्याबाबत आमचे अशिल दिवाणी न्यायालयात दावे दाखल करतील.

तरी वर नमुद मिळकती बाबत कोणत्याही इच्छुक व्यक्तींनी जमिन मालकांसोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक : २१/०८/२०२५

**ॲड.नितीन हरिश्चंद्र पाटील,**
पाटील वाडा, कवंडाल तलाव, पेण,
ता.पेण, जि.रायगड.
श्री.सुनिल मनहर खडावाला तर्फे वकील

---

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सौ. दीप्ती दिपक पाटील यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव खुर्द ता.अलिबाग | ९७/४ | क्षेत्र ०-३८-५९<br>पो.ख.०-००-००<br>एकुण क्षेत्र ०-३८-५९ | ९.३२ |

दिनांक : २१/०८/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता.माणगाव,जि,रायगड
### जाहीर निविदा

नोटीस प्रसिद्धी १८/०८/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता.माणगाव, जि.रायगड यांजकडून सन २०२५/२६ वर्षाकरिता ग्रा.पं.फंड योजनांतर्गत खालील कामांच्या/साहित्य पुरवठ्याच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फॉर्म फी | निविदा मिळणेची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीकरिता लोखंडी कपाट खरेदी करणे. | ग्रा.पं.फंड | २००००/- | १००/- | १८/०८/२०२५ | २५/०८/२०२५ | २ महिने |
| २ | ग्रामपंचायतीकरिता कलर प्रिंटर खरेदी करणे. | ग्रा.पं. फंड | २००००/- | १००/- | १८/०८/२०२५ | २५/०८/२०२५ | २ महिने |
| ३ | ग्रामपंचायतीकरिता स्पीकर खरेदी करणे. | ग्रा.पं.फंड | २००००/- | १००/- | १८/०८/२०२५ | २५/०८/२०२५ | २ महिने |
| ४ | अंगणवाडी विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी करणे | ग्रा.पं.फंड (१०%) | २००००/- | १००/- | १८/०८/२०२५ | २५/०८/२०२५ | २ महिने |

**अटी व शर्ती -** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि.२२/०८/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत पुरवठादार/ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगांव जि.रायगड**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/१ | एकूण क्षेत्र ०-१७-०० हे.आर. | ०.१२ |
| १६/५ | एकूण क्षेत्र ०-२९-०० हे.आर. | ०.१९ |
| १६/११ | एकूण क्षेत्र १-२६-०० हे.आर. | ०.६६ |
| १६/१३ | एकूण क्षेत्र ०-४३-०० हे.आर. | ०.२२ |
| १६/१७ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | ०.०९ |
| १५/८/ब | एकूण क्षेत्र ०-३१-०० हे.आर. | ०.२८ |
| १९/५ | एकूण क्षेत्र १-६०-०० हे.आर. | ०.६९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २१/०८/२०२५
ठिकाण :- पनवेल

सही/-
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१,
कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे बोरगाव, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. संकेत सुधीर पाटील यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. अक्षय तुकाराम कोकरे यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| बोरगाव | २५० | १.२७.००<br>पो.ख ०.१४.००<br>एकुण क्षेत्र १.४१.०० | २८.५० |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी १.अलिशा योगेश नागोठकर, २. उन्नती प्रतिक मोकल, ३. दिपाली दिलीप वडके, ४.नंदा रामचंद्र चौधरी, ५. नितीकेश रोहीदास गायकवाड, ६.मनीराज श्रीरंग माने, ७. सुरज संजय कारोडेकर, ८.संजय महादेव म्हात्रे, ९.अक्षय तुकाराम कोकरे यांच्या हिश्यातील जिरायत क्षेत्र ०.१२.५० हे.आर., पो.ख. ०.१४.०० हे.आर. असे एकुण क्षेत्र ०.२६.५० हे.आर. आकार २.८१ रू.पै.या क्षेत्रापैकी श्री. अक्षय तुकाराम कोकरे यांचा अविभाज्य हिस्सा हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण : पेण
दि.२१/०८/२०२५

सही
**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीमार्फत सर्व लोकांना कळविण्यात येत आहे की,

पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. २८ व २८अ या मिळकतीमध्ये बांधली गेलेली वास्तू 'काळण समाज मंदिर हॉल' या नावाने ओळखली जाते. सदरच्या या हॉल व आसपासची मोकळी जमीन मिळकत ही काळण समाजाच्या मालकीची वास्तू आहे. व तिचे नियंत्रण काळण समाज मंदिर (मध्यवर्ती) या काळण समाजाच्या रजिस्टर्ड संस्थेकडे (रजि नं.ए २७४८ मुंबई वरळी) आहे.

गेल्या १२ ते १३ वर्षापासून काळण समाज मंदिर (मध्यवर्ती) या संस्थेस कोणतेही कायदेशीर विश्वस्त मंडळ अस्तित्वात नाही. त्याबाबत मा. धर्मादाय आयुक्त सो.मुंबई वरळी येथे कायदेशीर लढाई चालू आहे. तसेच काही लोक आम्हीच विश्वस्त आहोत असे भासवून व सांगून सदरच्या काळण समाज हॉल या वास्तू बाबत व आसपासच्या मोकळ्या जागेबाबत व्यवहार करून इच्छित आहेत असे आम्हाला खात्रीलायकरित्या समजले आहे. तरी या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येत आहे की, सदरच्या काळण समाज हॉल व आसपासच्या मोकळ्या जागेबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा तोंडी अथवा लिखित व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर ठरेल व अश्याप्रकारे केलेल्या व्यवहारापासून होणाऱ्या नुकसानीस व्यवहार करणाऱ्या व्यक्तीच जबाबदार असतील व संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदरच्या काळण समाज हॉल या वास्तुस पनवेल महानगरपरिषदेचा वापर परवाना आजतागायत मिळालेला नाही.

अधिक माहिती करिता ॲडव्होकेट सच्चिदानंद शंकर झेमसे उर्फ दादा झेमसे मो. नं. ८०८७९८३५७६ यांच्याशी संपर्क साधावा

ठिकाण-पनवेल
दि.२१/०८/२०२५

आपले विश्वासू
काळण समाज मंदिर (मध्यवर्ती) या संस्थेचे आजिव सभासद

१)श्री.संजय घोडींदे-पनवेल २) श्री.अशोक चंदने-पनवेल ३)श्री. सुनिल देवळे-पनवेल
४)श्री.विजय साखरे-वाशी ५)श्री.विलास शहासने-नागोठणे ६)श्री.मयूर वनगे-पेण
७)श्री.शरद कोरके-कोन पनवेल ८)श्री.अरूणकुमार चंदणे-नागोठणे ९)श्री.निखील काळण-पेण

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे आर्ढे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेतजमीन मिळकतः-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| साधना मनोहर विशे | ७८ | ५अ | ०-३१-१० | १ | ७१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २१/०८/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

# बीसीसीआय देशापेक्षा मोठं?

## आदित्य ठाकरेंचा केंद्र सरकारला सवाल




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी बीसीसीआयच्या आशिया चषकातील पाकिस्तानशी खेळण्याच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांना पत्र लिहून दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय राष्ट्रीय हिताला धोका निर्माण करतो, असे म्हटले आहे. तसेच, बीसीसीआय देशापेक्षा मोठे झाले का? पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याच्या मुद्द्यावरुन आदित्य ठाकरेंनी थेट केंद्र सरकारलाच सुनावले आहे.**

पाकिस्तानकडून दहशतवादी हल्ले होत असताना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आशिया चषकात पाकिस्तानसोबत खेळण्यासाठी भारतीय संघ पाठवला आहे. त्यामुळे देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. आता याच संदर्भात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मंत्री मनसुख मांडविया यांना पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी दहशतवादासारख्या गंभीर मुद्द्यावर बीसीसीआयची भूमिका आणि राष्ट्रीय हितसंबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

दशकात आपल्या देशाला पाकिस्तानमधून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांना वारंवार तोंड द्यावे लागले आहे. अलीकडेच माननीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून 'पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही' असे म्हटले होते. असे असतानाही दुर्दैवाने, बीसीसीआय आशिया चषकात पाकिस्तानशी खेळण्यासाठी एक संघ पाठवत आहे. या कृतीमुळे असा प्रश्न निर्माण होतो की, बीसीसीआय राष्ट्रीय हितापेक्षा आणि आपल्या जवानांच्या बलिदानापेक्षा मोठा आहे का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला आहे. तसेच, भूतकाळात अनेक राष्ट्रांनी मानवतेच्या भल्यासाठी खेळांमध्ये सहभाग घेतला नाही. दहशतवाद हा एक असाच मुद्दा आहे जो दोन्ही देशांना शांततेत प्रगती करू देत नाही. तरीही, केवळ पैशाच्या आणि जाहिरातींच्या हव्यासापायी बीसीसीआय आपल्या जवानांचे बलिदान आणि जीवन नगण्य मानते, असा आरोपही आदीत्य ठाकरे यांनी या पत्राद्वारे केला आहे.

आम्ही जगाला शिष्टमंडळे पाठवून पहलघमच्या मागे पाकिस्तान आहे, असे सांगितले. आता आम्ही जगाला शिष्टमंडळे पाठवून, आम्ही पाकिस्तानसोबत क्रिकेट का खेळत आहोत, याचे समर्थन करणार का? असेही आदित्य ठाकरेंनी म्हटले आहे.

पाकिस्तानने भारतातील खेळाडूंना वारंवार धमक्या दिलेल्या असताना, बीसीसीआयने केवळ स्वतःच्या फायद्यासाठी पाकिस्तानसोबत सामने खेळणे ही एक लाजिरवाणी गोष्ट आहे. मला आशा आहे की, जरी आपण राजकारणात वेगवेगळ्या बाजूने असलो तरी, या विचारावर आपण एकत्र येऊ. ज्याप्रमाणे आम्ही 'ऑपरेशन सिंदूर'साठी आपल्या माननीय पंतप्रधानांना पाठिंबा दिला होता, त्याचप्रमाणे आपण या प्रश्नावरही एकत्रितपणे पुढे जाऊ, असेही आदित्य ठाकरेंनी पत्रात नमूद केले आहे.

### पैशाच्या लोभापायी पाकिस्तानसोबत सामने

**गेल्या अनेक वर्षांपासून देशातील नागरिक आणि सैन्याने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ले वारंवार सहन केले आहेत. यासंदर्भात केंद्र सरकारने आपली भूमिका नेहमीच ठामपणे मांडली आहे. नुकतेच, पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून सांगितले की, आता पाणी आणि रक्त दोन्ही एकत्र वाहू शकत नाहीत. तरीही, दुर्दैवाने बीसीसीआय आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानसोबत खेळण्यासाठी एक संघ पाठवत आहे. केवळ बीसीसीआयच्या हट्टामुळे, पैशाच्या लोभापायी, आपल्या जवानांच्या बलिदानाला कमी लेखले जात आहे. आम्ही जगभरातील देशांमध्ये शिष्टमंडळे पाठवून पाकिस्तानची दहशतवादी बाजू उघड करत आहोत. आता आपण त्यांच्यासोबत क्रिकेट खेळत असल्याबद्दल जगभरात आपली बाजू कशी योग्य ठरवणार?**

## बास्केटबॉल निवड चाचणीचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्यावतीने १३ वर्षाखालील मुले व मुलींसाठी रायगड जिल्हांतर्गत बास्केटबॉल स्पर्धा व जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा दि.२३ व २४ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजता खारघर येथील विबग्योर शाळेत पार पडणार आहेत. या निवड चाचणीतून निवडलेला संघ दि.११ ते १६ सप्टेंबर दरम्यान सोलापूर येथे आयोजित होणाऱ्या १३ वर्षाखालील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंना या निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशन ऑफ रायगडकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी मंदार म्हात्रे (८८५०८००२९९) व आकाश चाकणे (९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा.

## निवडक

### साताऱ्यात खो-खो पंच शिबीर

**सातारा :** महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सातारा जिल्हा मॅच्युर खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य खो-खो पंच शिबीर यंदा साताऱ्यात अत्यंत उत्साहात पार पडले. या शिबिरात ५८० नोंदणीपैकी तब्बल ४०६ पंचांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वाधिक उपस्थिती असलेली राज्यस्तरीय खो-खो पंच प्रशिक्षण कार्यशाळा ठरली आहे. निर्मल हॉटेल येथे पार पडलेल्या उद्घाटन समारंभाला महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव हे अध्यक्षस्थानी होते. तर, भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र संघटनेचे खजिनदार अ‍ॅड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, संदीप तावडे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून पंचांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तांत्रिक समिती, पंचमंडळ व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. या शिबिरात पंचांना नव्या नियमांची माहिती, तांत्रिक मार्गदर्शन, प्रत्यक्ष मैदानावर येणाऱ्या समस्यांचे सादरीकरण तसेच व्हिडिओ विश्लेषण अशा आधुनिक व परिपूर्ण पद्धतींनी प्रशिक्षण देण्यात आले. डॉ. जाधव यांनी सांगितले की, विश्वचषक स्पर्धेनंतर महाराष्ट्राच्या पंचांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व परिणामकारक काम करणारे बनवण्यासाठी हे शिबीर अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

### अय्यर-जयस्वालवर अन्याय झाल्याचा अश्विनचा आरोप

**नवी दिल्ली :** अगामी आशिया चषकसाठी भारतीय संघ जाहीर झाला आहे. शुबमन गिल टी-२० संघात परतला आहे आणि त्याला आशिया चषकासाठी उपकर्णधारही बनवण्यात आले आहे. परंतु, यशस्वी जयस्वाल आणि श्रेयस अय्यर सारख्या अनुभवी खेळाडूंना संघात स्थान मिळाले नाही. आशिया चषक संघात या दोन खेळाडूंची निवड न झाल्याबद्दल माजी भारतीय फिरकी गोलंदाज आर. अश्विनने संताप व्यक्त केला आहे. आर. अश्विनने म्हटले आहे की, निवड ही अशी नोकरी आहे ज्यामध्ये नेहमीच कोणीतरी वगळले जाईल. जेव्हा तुम्ही त्यांच्याशी बोलता तेव्हा तुम्हाला त्यांच्या चेहऱ्यावर निराशा आणि दुःख जाणवू शकते. आशा आहे की, कोणीतरी श्रेयस आणि जयस्वालशी बोलले असेल. तो पुढे म्हणाला की, जेव्हा तुमच्याकडे तिसरा सलामीवीर म्हणून जयस्वाल असतो, तेव्हा तुम्ही विश्वचषक विजेत्या संघातून एकाला काढून शुबमन गिलला आणले. मी शुबमनसाठी आनंदी आहे; परंतु, श्रेयस आणि जयस्वालसाठी दुःखी आहे. दोघांसाठीही परिस्थिती चांगली झाली नाही. अय्यरचा रेकॉर्ड पहा. तो संघाबाहेर होता. परंतु, त्याने अजिंक्यपद चषकात शानदार फलंदाजी केली. त्याने तुम्हाला स्पर्धा जिंकून दिली. जर उत्तर असेल की शुबमन गिल देखील उत्तम फॉर्ममध्ये आहे, तर श्रेयस अय्यर देखील आहे. जयस्वालने ओव्हलमधील शेवटच्या सामन्यात कठीण खेळपट्टीवर शानदार खेळी केली. याचे उत्तर काय असेल, असा प्रश्न उपस्थित केला आहे.




### फिल सॉल्टचा हवाई झेल

**लंडन :** इंग्लंडमध्ये द हंड्रेड लीग स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेतील २० वा सामना मँचेस्टर ओरिजिनल्स आणि ट्रेंट रॉकेट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात मँचेस्टर ओरिजिनल्स संघाचा कर्णधार फिल सॉल्टने हवेत डाईव्ह मारून एका हाताने अविश्वसनीय झेल घेत, सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांनाही या झेलवर विश्वास बसत नव्हता. या झेलचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. मँचेस्टर ओरिजिनल्स संघाची गोलंदाजी सुरू असताना जोश टंग गोलंदाजी करत होता. त्यावेळी टंगने या डावातील ४८ वा चेंडू टाकला. त्यावेळी ट्रेंट रॉकेट्स संघाकडून मॅक्स होल्डन फलंदाजी करत होता. होल्डनने हा चेंडू ऑफ साईडच्या दिशेने खेळून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, चेंडू बॅटला लागताच हवेत गेला. त्यावेळी मँचेस्टर ओरिजिनल्स संघाचा कर्णधार फिल सॉल्ट ३० यार्ड सर्कलच्या आत फलंदाजी करत होता. हा चेंडू त्याच्यापासून दूर जात होता. परंतु, त्याने डाईव्ह मारली आणि दमदार झेल घेतला. या सामन्यात मँचेस्टर ओरिजिनल्स संघाला नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी यावे लागले. प्रथम फलंदाजी करताना मँचेस्टर ओरिजिनल्स संघाला ८ गडी बाद ९८ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना ट्रेंट रॉकेट्स संघाने ७४ चेंडूत दिलेले आव्हान पूर्ण केले आणि ७ गडी राखून विजयाची नोंद केली.



### आंध्र प्रीमियर लीगमध्ये पी. अर्जुन तेंडूलकरचा बोलबाला

**अमरावती:** आंध्र प्रीमियर लीग २०२५ मध्ये पी. अर्जुन तेंडुलकरने आक्रमक खेळी केली. त्याने काकिंदा किंग्सकडून खेळताना ३ चौकार आणि ३ षटकार मारले. तो त्याच्या कामगिरीसोबतच त्याच्या नावामुळे चर्चेचा विषय ठरला आहे. अर्जुन तेंडुलकर म्हटलं की प्रत्येकाला दिग्गज सचिन तेंडुलकरचा मुलगा आठवतो. परंतु, सध्या एका दुसऱ्याच अर्जुन तेंडुलकरची चर्चा क्रिकेटच्या मैदानातील कामगिरीमुळे सुरू झाली आहे. सध्या आंध्र प्रीमियर लीग २०२५ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत मंगळवारी झालेल्या एका सामन्यात पी. अर्जुन तेंडुलकर नावाच्या खेळाडूने सर्वांचे लक्ष वेधले. त्याने केलेल्या आक्रमक खेळीमुळे तो प्रकाशझोतात आला आहे. पी. अर्जुन तेंडुलकर साधारण सलामीला फलंदाजी करतो. आंध्र प्रीमियर लीगमध्ये सध्या तो काकिंदा किंग्सकडून खेळत आहे. मंगळवारी काकिंदा किंग्सचा सामना भीमावरम बुल्स संघाविरुद्ध झाला या सामन्यात भीमावरम संघाने काकिंदासमोर विजयासाठी २१५ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करता पी. अर्जुन तेंडुलकरने ३ चौकार आणि ३ षटकार ठोकताना आक्रमक ३१ धावा केल्या. पण तिसऱ्याच षटकाच्या पहिल्या चेंडूवर तो बाद झाला.

## भारतीय खेळाडू नेमबाजीत 'अजिंक्य'




**। श्यामकेंट । वृत्तसंस्था ।**

भारतीय नेमबाजांची आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेतील पदकांची लयलूट कायम राहिली. पॅरिस ऑलिंपिकमध्ये पदक पटकावणारी मनू भाकर हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक पटकावले. तर, रश्मिका सहगल हिने कनिष्ट महिला विभागातील एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्यामुळे भारतीय नेमबाजांनी या स्पर्धेमध्ये आतापर्यंत पदकांची लयलूट केली आहे.

मनू भाकर हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात २१९.७ गुणांची कमाई करीत कांस्यपदकाची कमाई केली. चीनच्या कियांके मा हिने २४३.२ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर हक्क सांगितला. कोरियाच्या जिन यांग हिने २४१.६ गुणांची कमाई करीत रौप्यपदक पटकावले. तसेच, भारतीय महिला नेमबाजांनी महिलांच्या सांघिक प्रकारातही कांस्यपदक आपल्या नावावर केले. त्यात मनू भाकर हिने ५८३ गुणांची कमाई केली. मनू भाकरने पलक (५७३ गुण) व सुरुची सिंग (५७४ गुण) या दोघींच्या साथीने ही कामगिरी केली. रश्मिका सहगलने महिलांच्या ज्युनियर विभागातील पिस्तूल प्रकारात २४१.९ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली. रश्मिका सहगल हिने पात्रता फेरीमध्ये ५८२ गुणांची कमाई केली होती. रश्मिका हिने वंशिका चौधरी व मोहिनी सिंग यांच्या साथीने महिलांच्या सांघिक विभागातही सुवर्णपदक पटकावले. वंशिका चौधरी हिने ५७३ गुणांची आणि मोहिनी सिंग हिने ५६५ गुणांची कमाई केली.

## जूनियर अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा जूनियर अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन दि. २४ व २५ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धा उलवे येथील जिओ इन्स्टिट्यूट या ठिकाणी पार पडणार आहेत. या स्पर्धेमध्ये १४, १६, १८, २० व २३ वर्षाखालील मुले व मुलींचे गट पाडण्यात येणार आहेत. या अ‍ॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या खेळाडूंनी क्रीडा प्रकार व अधिक माहितीसाठी प्रविण खुटारकर (९७७३५२५७७७) व यतीराज पाटील (९९२११७१७००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## सहानुभूतीची गरज नकोय: पृथ्वी शॉ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बुची बाबू चषक सामन्यात मंगळवारी महाराष्ट्राकडून खेळताना भारतीय संघाचा फलंदाज पृथ्वी शॉने शतक झळकावले. गुरु नानक कॉलेजमध्ये छत्तीसगडविरुद्ध १४१ चेंडूत १११ धावा करून शॉने प्रभाव पाडला. तथापि, शतकी खेळी केल्यानंतर पृथ्वी शॉने, त्याला कोणाचीही सहानुभूती नको आहे, असे स्पष्ट केले आहे.

गेली काही वर्षे क्रिकेटच्या मैदानावर पृथ्वी शॉसाठी खूप वाईट गेली आहेत. भारतीय संघातून वगळल्यानंतर तो आयपीएलमध्येही विशेष काही करू शकला नाही. त्याच्या फिटनेस आणि शिस्तीबद्दलही बरीच चर्चा झाली होती. पृथ्वी शॉ अनेक चुकीच्या कारणांमुळे चर्चेत होता. तथापि, गेल्या काही महिन्यांत शॉला अनेक माजी क्रिकेटपटूंकडून पाठिंबा मिळाला आहे आणि आता तो त्याच्या क्रिकेट कारकिर्दीला पुन्हा योग्य दिशेने नेण्यास उत्सुक आहे. यादरम्यान पृथ्वी शॉ म्हणाला की, मला पुन्हा सुरुवात करण्यात काहीच अडचण नाही. कारण मी माझ्या आयुष्यात खूप चढ-उतार पाहिले आहेत. मी खूप आत्मविश्वासू माणूस आहे, मला स्वतःवर, माझ्या काम करण्याच्या पद्धतीवर पूर्ण विश्वास आहे. पुढे तो म्हणाला की, काही हरकत नाही, मला कोणाची सहानुभूती नको आहे. मी हे आधी पाहिले आहे. मी मानसिकदृष्ट्या ठीक नसताना मला माझ्या कुटुंबासह मित्रांचाही पाठिंबा मिळाला. म्हणून, सर्व काही ठीक आहे.

## प्रज्ञानंदची तिसऱ्या स्थानावर झेप



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सिंकफील्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेशवर मात केली आणि थेट लाईव्ह जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. या विजयासह प्रज्ञानंद अमेरिकेच्या लेव्होन अरोनियनसोबत संयुक्त अव्वल स्थानावर पोहोचला आहे. अरोनियनने सोमवारी झालेल्या पहिल्या फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोववर विजय मिळवला होता. पहिल्या फेरीतील इतर सामन्यांत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाने पोलंडच्या डुडा जान-क्रिजस्टोफविरुद्ध बरोबरी साधली. सॅम्युअल सवियनने अमेरिकेच्याच वेस्ली सोसोबरोबर गुण वाटून घेतले. स्पर्धेत अजून आठ फेऱ्या बाकी आहेत. प्रज्ञानंद आणि अरोनियननंतर सहा खेळाडू संयुक्तरीत्या तिसऱ्या स्थानावर आहेत.

## रायगडच्या मुलांची नेत्रदीपक कामगिरी

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

राज्यस्तरीय पिंच्याक सिलाट स्पर्धा १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान कोपरखैरणे येथील क्रिस्ट अकॅडमी येथे पार पडल्या. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी १२ पदके जिंकत राज्यात आपली छाप पाडली आहे. या स्पर्धेत राज्यभरातून सुमारे ३५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

पिंच्याक सिलाट हा इंडोनेशियन मार्शल आर्टचा खेळ असून हा टँडिंग (फाईट), तुंगल (सिंगल इव्हेंट), रेगु (ग्रुप इव्हेंट), गंडा (डेमो फाईट), सोलो (क्रीएटीव्हिटी) या पाच प्रकारामध्ये खेळला जातो. या स्पर्धेत खेळताना रायगडच्या खेळाडूंनी ५ सुवर्णपदके आपल्या नावावर केली आहेत. त्यामध्ये टँडिंगमध्ये सुबोर्ण चक्रवर्ती, अर्णव रावकर, स्पृहा विचारे, पियुष साळुंके व नेहा दोरे या खेळाडूंनी सुवर्णपदक जिंकले आहे. त्यांची कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तसेच, संकल्प चक्रवर्ती, रियांशी सिंह, शर्वरी खोपकर, प्रांजल खरपूडे, प्रीत माळी व अनिश पालकर यांनी सोलो इव्हेंट व टँडिंगमध्ये रौप्यपदक जिंकून रायगडच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला आहे. यावेळी रायगडच्या संघासोबतच सम्यक गायकवाड याने संघ प्रशिक्षक म्हणून आपली निवड सार्थ ठरवली आहे. सर्व खेळाडू हे रायगड जिल्हा पिंच्याक सिलाट संघटनेचे सचिव धनंजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत असून सर्व खेळाडूंचे संघटनेचे अध्यक्ष रुपेश जाधव यांनी अभिनंदन केले आहे.



## थेट दुबईत पोहोचून सराव

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या प्रवासाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ४ किंवा ५ सप्टेंबर रोजी दुबईला रवाना होणार आहे. ९ तारखेपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी भारतीय संघासाठी स्वतंत्र सराव शिबीर ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे थेट दुबईत पोहोचून खेळाडू स्पर्धेची तयारी करणार आहेत. आशिया चषक २०२५ ही क्रिकेट स्पर्धा युएईमधील दुबई आणि अबू धाबी पार पडणार आहे. बीसीसीआयने स्पर्धेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली असून, सूर्यकुमार यादव कर्णधार तर शुभमन गिल उपकर्णधार असणार आहे.

**आशिया चषकासाठी भारतीय संघ जाहीर | अनुभवी १८ खेळाडूंना संधी**

## हरमनप्रीत सिंगकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हॉकी इंडियाने आगामी पुरुष आशिया चषकासाठी १८ सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा केली आहे. ही स्पर्धा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान बिहारमधील नुकत्याच विकसित झालेल्या राजगीर हॉकी स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत भारताला जपान, चीन आणि कझाकस्तानसह गट 'अ' मध्ये स्थान देण्यात आले आहे. तसेच, अनुभवी ड्रॅग-फ्लिकर हरमनप्रीत सिंग आगामी स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. एकूणच, हॉकी आशिया चषकासाठी संघात अनुभवी खेळाडूंचा समावेश असून त्यांच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.




संघ जाहीर झाल्यानंतर, भारतीय हॉकी पुरुष संघाचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले की, आम्ही एक अनुभवी संघ निवडला आहे, ज्यांना दबावाखाली कसे कामगिरी करायची हे माहित आहे. आशिया चषक आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. कारण विश्वचषकासाठी आमची पात्रता धोक्यात आहे, म्हणून आम्हाला संयम आणि चांगली कामगिरी करण्यासाठी कौशल्य असलेल्या खेळाडूंची आवश्यकता होती. ते पुढे म्हणाले की, मी संघाच्या संतुलन आणि गुणवत्तेवर खूप खूश आहे. आमच्याकडे प्रत्येक विभागात (बचाव, मध्यक्षेत्र आणि आक्रमण) अनुभवी खेळाडू आहेत आणि ही सामूहिक ताकद मला सर्वात जास्त उत्साहित करते. मला वाटते की ही संघ ज्या पद्धतीने एकत्र खेळतो ती आमची सर्वात मोठी ताकद असेल, असे फुल्टन म्हणाले.

या स्पर्धेत गोलकीपिंगची जबाबदारी विश्वासू कृष्ण बी पाठक आणि सूरज करकेरा सांभाळताना दिसतील. तर, बचावफळीत कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि अमित रोहिदास यांच्यासोबत जर्मनप्रीत सिंग, सुमित, संजय आणि जुगराज सिंग हे संरक्षण युनिटला बळकटी देतील. मध्यक्षेत्रात मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद, राजिंदर सिंग, राजकुमार पाल आणि हार्दिक सिंग असे मजबूत खेळाडू आहेत. फॉरवर्ड आक्रमणाचे नेतृत्व मनदीप सिंग, अभिषेक, सुखजीत सिंग, शिलानंद लाक्रा आणि दिलप्रीत सिंग करणार असून ते कोणत्याही विरोधी बचावफळीला अडचणीत आणण्याची क्षमता बाळगतात.

### पाकिस्तान, ओमानची माघार

**पाकिस्तान आणि ओमान या देशांनी भारतात होणाऱ्या पुरुषांच्या आशियाई चषक हॉकी स्पर्धेतून मंगळवारी अधिकृतपणे माघार घेतली आहे. त्यांच्या जागेवर आता बांगलादेश आणि कझाकिस्तान या संघांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे बांगलादेश आणि कझाकिस्तानला ड्रॉमध्ये सामील करण्यात आले.आशिया चषकातून बाहेर पडल्याने पाकिस्तानने विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र होण्याची एक मोठी संधी गमावली आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)